
# प्रकरण चौथे

## संत नामदेवांच्या जीवनातील महत्वाचे नाट्यमय प्रसंग



# प्रकरण – चौथे

## संत नामदेवांच्या जीवनातील महत्त्वाचे नाट्यमय प्रसंग

### १) संत गोरोबाकुंभार – यांची भेट

(शके ११८९ – इ.स. १२६७ ते इ.स. १३०९) हा संत गोरोबांचा कालावधी. संत नामदेवांना मार्गदर्शन करणारे संत गोरोबा कुंभार हे श्रेष्ठ भगवद्‌भक्त होते. ते तेरढोळी येथे राहणारे सर्व संतमंडळीत वयाने श्रेष्ठ होते. त्यामुळे त्यांना सर्वजण गोरोबाकाका म्हणत. संत सोपानदेव, विसोबा खेचर, नामदेव अशी ही परंपरा असून नाथपंथियाचा योगमार्ग तेराव्या शतकात भक्तिमार्गाकडे झुकलेला दिसतो. याच भक्तिमार्गात रममाण झालेला संत नामदेवांच्या प्रेमातील हा संत होता. त्यांचे वैराग्य श्रेष्ठ असून त्यात भक्तीचा ओलावा असे. माती तुडविताना, मडकी घडविताना यांचे चित्त सदैव श्री हरीच्या चिंतनात दंग असे.

" केशवाचे ध्यान धरूनि अंतरी । मृत्तिके माझारीं नाचतसे ॥१॥
विठ्ठलाचे नाम स्मरे वेळो वेळा । नेत्री वाहे जळ सद्‌गदीत ॥२॥
कुलालाचे वंशीं जन्मले शरीर । तो गोरा कुंभार हरिभक्ता ॥३॥

असा या गोरोबा काकांचा गौरव झालेला आहे. तेरढोकीच्या[1] या भगवद्‌भक्ताची व नामदेवांची मोठीच जिव्हाळ्याची मैत्री होती. संत परीक्षक म्हणुन प्रसिद्ध असलेल्या याच गोरोबांनी नामदेवांना सावध केले. व त्यानंतर देवाच्या सांगण्यावरून संत नामदेव विसोबा खेचराकडे गेले असे हे थोर संत परमेश्वर भक्तीत सदा तल्लीन असत. गोरोबांनी स्वतःचे मूल पायाखाली तुडविले गेले तरी दुःख मानले नाही इतके ते अनासक्त होते "पोराचे कर्म. त्यात देवाचा काय दोष? " असे त्यांनी आपल्या पत्नीला म्हटले. आपली आण मोडली म्हणून त्यांनी आपले दोन्ही हात मोडून घेतले, त्यांचे काव्य अत्यल्प आहे. नामदेवादिकांप्रमाणे त्यांना भक्तीच्या मार्गात येणाऱ्या विकारांशी झगडावे लागलेले नाही. त्यामुळे त्यातून अनुभूतीच्या विविध

छटा सापडत नाहीत.) देवाची आठवण येताच ते देहभान विसरून गाऊ लागत. व ब्रह्मसुखाचा आनंद घेत. त्यांच्या अभंगात अव्दैत साक्षात्काराचा भास होतो. संतज्ञानदेवांच्या भक्तीचा व काव्याचा परिणाम त्यांच्यावर झालेला आढळतो. पंढरीची वारी आणि मुखी विठोबाचे नाम या प्राणप्रिय साधनेला गोरोबांनी जन्मभर सोडले नाही. संत गोरोबाचे काही थोडे अभंग प्रसिद्ध आहेत.

"देवा तुझा मी कुंभार । नाशी पापांचे डोंगर ।।'

'म्हणे गोरा कुंभार सहज जीवनमुक्त । सुखरूप अव्दैत नामदेवा ।'

'म्हणे गोरा कुंभार नाही रूपरेख तेचि तुझें मुख नामदेवा ।।'

इत्यादि ओळींतून गोरोबांचा नामदेवांविषयीचा भाव व्यक्त झाला आहे. श्री गोरोबांचे दिव्य पुनीतचरीत नामदेवांनीच आपल्या अभंगात ग्रंथात केले आहे. खरे तर गोरोबांनीच नामदेवांचे भक्तिज्ञानरूपी देहाचे मडके कच्चे ठरविले होते. मोरोपंतांनी म्हटले आहे, 'सद्गुरू अनुग्रहाविण कठीण सर्वथा पटणे । गोरा संत परिक्षी हाणुनी सर्व थापटणे ।।' गोराबा असे अध्यापक नव्हते पण अध्यापकांचे परीक्षक होते. त्यांचे हे आनुभाविक श्रेष्ठत्त्व, दिव्यत्व असणे परतत्त्वदर्शी ज्ञान नामदेवांनी अनुभवलं होत.

अशा या थोर संताच्या भक्तीमध्ये ज्यावेळी प्रांपचिक विघ्ने आली. गोरोबांनी श्री विठ्ठलाची शपथ आपल्याहातून मोडली म्हणून आपले हात तोडले : भक्ताच्या निष्ठेची ही केवढी पराकाष्टा. आता देवच गोरोबाचे काम करायला वेष पालटून गोरोबांचे घरी आहे. देव झाले कुंभार आणि गरुड झाला गाढव. देव लक्ष्मीसह गोरोबांचे घरी राहून गोरोबांचा प्रपंच चालवू लागले त्यावेळी गोरोबांचे दैन्य दूर निघून गेले. संत ज्ञानदेवादि संतांचा मेळा पंढरीला निघाला. वाटेत ही सारी मंडळी तेरला गोरोबांच्या घरी आली त्यावेळी देवाने लक्ष्मीसह पंढरीला प्रयाण केले. ज्ञानदेवांनी गोरोबांना सांगितले, तुमच्या घरी काम करीत असलेला परदेशी कुंभार म्हणजे साक्षात श्री पांडुरंगच. त्यांनी केलेली घडविलेली मडकी आणा म्हणजे तुम्हाला सांगतो. गोरोबाच्या कांतेने दोन – तीन मडकी आणली. 'ज्ञानदेव म्हणे भाजने आणावी । तंवती देखील

अवघी दिव्य रूप । उचलोनि करि घेतले भाजन । विठ्ठल विठ्ठल जाण शब्द निघे । सकळ ते संत गोरियासी म्हणती । धन्य तुझी भक्ती भैलोक्यात ।। (संत एकनाथ देवाने घडविलेल्या मडकयातून विठ्ठल विठ्ठल ध्वनी निघाला. त्यानंतर गोरोबांच्या घरी सर्वांनी भोजन घेतले. संतमंडळी सह गोरोबा व्दय पत्नीसह पंढरीच्या यात्रेत सामील झाले. 'आषाढी कार्तिकी विसरू नका मज हा संताचा प्राणाप्रिय आचार असतो. सारेजण पंढरीला आले. प्राणसख्या विठोबास उराउरी भेटले. रात्री संत नामदेवांचे कीर्तन पंढरीच्या वाळवंटात झाले. कीर्तनात टाळी वाजवून नामगजर सुरू झाला. गोरोबांचे थोटे हात वर झाले. तो त्यांना 'कीर्तनी गोरियाप्रति कर आले ।' आणखी काय घडलं श्रीनाथ सांगतात, 'कुलाल वेषात गोरा तो कुंभार कीर्तीचराचरी भरीयेली (संत एकनाथ), संत ज्ञानदेव नामदेवादि संतांसमवेत श्री गोरोबा काम तीर्थ यात्रेसही गेले होते. संत नामदेवांच्या तीर्थावळीत त्याचा उल्लेख आहे.' 'हा गोरा कुंभार अंतरनिष्ठ ।' गोरोबा असे अंतःकरणी भक्तभागवत होते. संत ज्ञानदेवांच्या समाधी प्रसंगीही श्री गोरोबा उपस्थित होते. या संतावरची त्यासमयीची स्थिती नामदेवांनी लिहून ठेवली आहे.

''विठोबा खेचर चांगा वटेश्वर । केला नमस्कार अवघियांनी ।। गोराकुंभार सावता माळी । नामा तळमळी वत्सा ऐसे ।।'

श्री गोरोबांचे काही अभंग आज उपलब्ध आहेत. पण त्यांची श्रेष्ठ भक्ती हेच त्यांचे थोर वैभव होय. लोकोद्धारासह आत्मोद्धार हे गोरोबांचे ध्येय होते. ते त्यांनी याची देही सिद्ध केले.

'मुकिया साखर चाखापयी दिधली । बोलता हे बोली बोलवेना ।।१।।

तो काम शब्द खुंटला अनुवाद । आपुला आनंद आधाराया ।।२।।

आनंदीआनंद गिळूनी राहणें । अखडित होणे न हो तिया ।।३।।

ह्मणे गोराकुंभार जीवन मुक्त होणें । जग हें करणे शहाणे बापा ।।४।। [२]

असा हा भक्तराज सत्यपुरीत म्हणजेच तेरगावी चैत्र वद्य त्रयोदश श्री विठ्ठलाचे चरणी लीन झाला.

आत्मलीन झाला 'म्हणे गोरा कुंभार विठ्ठल मंत्र सोपा । एकवेळ बापा उच्चारिरे ।। हा त्यांचा अंतरीचा अंतिम संदेश आचरण्यातच सर्वांचे हित आहे. अशा या थोर संताचा संतनामदेवांच्या जीवनात त्यांना सद्गुरू कृपेची प्रेरणा देण्यात महत्त्वाची भूमिका आहे त्यामुळेच संत नामदेवांना' सद्गुरूची कृपादृष्टी लाभली. ती अशा महान संतामुळेच.

## २ श्री विसोबा खेचर यांची भेट –

विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरू होते. संत ज्ञानेश्वर नामदेवांच्या उत्तरेतील यात्रेत हे इतर संताबरोबर होते. पैठण जवळच्या 'मुंगी' या गावाचे राहणारे. याबाबत दासो दिगंबर आपल्या 'भक्त – विजयात' लिहितात की,

"विसोबा खेचरजाण । राहे मुंगीमाजी आपण ।
खिस्तीचा उदिम करून । काळक्रमण करीतसे ।।'

कवी या नात्याने ते विशेष प्रसिद्ध नाहीत पण भागवत धर्माचे एक प्रवर्तक या दृष्टीने त्यांची योग्यता मोठी आहे. विसोबा खेचर यांच्या विषयी दुसरे मत असे आहे की, ते मूळ आळंदीचे राहणारे. त्यांचे मूळ नाव विसोबा चाटी असे महिपतीने भक्तिलीलामृत ग्रंथात दिले आहे. ते युजुर्वेदी ब्राह्मण पण धंदा उपाध्येपणाचा नसून ते सराफीचा व्यवसाय करीत असत. त्यांच्या विषयीचे एका कथेवरून ते मूळ शिवभक्त होते. ती कथा अशी आहे की, श्री ज्ञानदेवादि भावंडे आळंदीत माधुकरी मागून आपला निर्वाह करीत असत. विसोबा खेचर या भावंडाचा संन्याशाची मुले म्हणून व्देष करीत असत व त्यांचा छळ करीत असत. एकदा ज्ञानदेवास मांडे खाण्याची इच्छा झाली तेव्हा मुक्ताबाई कुंभाराकडे जाऊन खापर मागणेसाठी गेली असता विसोबा हा ज्ञानदेवांच्या घराशेजारीच राहत असल्याने मुक्ताईच्या मागोमाग आला व कुंभाराला खापर न देणे विषयी दम दिला. निराश होऊन मुक्ताई घरी आली. सर्व वृत्तांत ज्ञानदेवास सांगितला तेव्हा ज्ञानदेवाने योगबळाने जठराग्नी पेटवून आपल्या तप्त पाठीवर मुक्ताबाईकडून मांडे भाजून घेतले. ही भावंडे काय

करतात. हे पाहण्यासाठी विसोबा खेचर मागावर होताच. त्याने ज्ञानदेवांच्या झोपडीचे झरोक्यातून हे दृष्य पाहिल्यावर त्यास पश्चाताप झाला. उपरती होऊन तो या भावंडाना शरण आला. ज्ञानदेवांनी त्यास 'खेचर' म्हणून संबोधिले. तेव्हा पासून त्यांचे नांव "विसोबा खेचर" हेच नाव लौकिकात प्रसिद्ध झाले. विसोबा खेचराचे मूळ नाव विसोबा चाटी असे होते. संत सोपानदेवांनी त्यास गुरू दिक्षा दिली ते विसोबा आपल्यास अभंगात दर्शवितात.

"माझी मूळ पीठिका सोपान सद्गुरू ।तेणे माथा करू ठेवियला ।।

चांगण्यांचा अंगिकार मुक्ताईने केला । सोपान बोलला मज लागी ।।

जन्ममरणाचे भय नाही आता । खेचरी तत्त्वता मुद्रा दिली ।।"

सोपान देवांच्या आरतीत ही ते आपला गुरू म्हणून उल्लेख करतात. खेचर विसा सोपानदेवास आपला गुरू मानतात. परंतु ते संत ज्ञानदेवासही गुरू मानतात. विसोबा खेचर म्हणतात, 'महाविष्णूचा अवतार श्री गुरू माझा ज्ञानदेव.' तसेच नामदेवास अनुग्रह करताना अ. न. १३५९ या अभंगाच्या शेवटी म्हणतात.

"मग खेचरू म्हणे ज्ञान हेच गुरू । त्याने अगोजरू केला नामा ।।"

ल. रा. पांगारकर म्हणतात विसोबा खेचर दोघासही गुरू मानीत असत. तर अ. ना देशपांडे प्रश्नचिन्ह उभे करतात. परमार्थ मार्गात दोन गुरू असतात काय ? वास्तविक संत नामदेव हेच संतजनाबाईचे परमार्थ मार्गातील गुरू आहेत परंतू संत जनाबाईने संत ज्ञानेश्वरासही गुरू मानले आहे. कदाचित संत ज्ञानेश्वरांचा अध्यात्मिक तत्त्वज्ञानात अधिकार मोठा म्हणून ज्ञानेश्वरांवरील प्रेमानुरागानुसार विसोबाने व जनाबाईनेही संत ज्ञानेश्वरास आपले गुरू मानले असावे. ज्ञान,शब्द येथे व्यक्तिवाचक नसावा. ज्ञान या संताचे तृतीय पुरुषी एकवचनी नाम म्हणून येथे ज्ञान या शब्दाची उपाय योजना असावी. संपूर्ण अभंग १३५९ वाचल्यावर ज्ञानप्राप्ती हीच गुरूप्राप्ती असा त्याचा अर्थ निघतो. सोपानदेवा कडून दीक्षा घेतल्यानंतर काही काळ विसोबा खेचर ज्ञानदेवादि भावंडांचे संगतीत राहून नंतर औंढ्यानागनाथ याप्रसिद्ध शिवतीर्थ क्षेत्री

रहावयास गेले. खेचरी विद्या त्यांना नाथपंथामध्ये मिळाली असावी.

संत गोरोबा काकाकडून संत नामदेवांना जेव्हा आपले स्वतःचे 'मडके कच्चे' आहे हे समजल्यावर नामदेवांनी श्रीविठ्ठलाकडे धाव घेतली त्यावेळी श्रीविठ्ठलाने नामदेवास सिद्धपुरुषाशी भेट घ्यावी म्हणून आज्ञा केली.

''देव म्हणे नाम्या विसोबा खेचरासी । शरण तयासी जावें वेगी ॥१॥

इतुकें ऐकोनि नमियेलें देवा । चालयेला तेव्हां विसोबा याशीं ॥२॥

चिंताग्रस्त नामा आला आंवढ्यासी । पुढें देऊळासी देखियेलें ॥३॥

नामा तये काळीं गेला देऊळांसी । देऊळी कौतुकासी देखियेले ॥४॥ [३]

त्यावेळी संत नामदेव औंढ्यास विसोबा खेचराकडे गेले. पूर्वीचे निजाम राज्यांचा भाग व आताचे मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील औंढ्यानागनाथ हे भारतातील बारा ज्योर्तिलिंगापैकी एक ज्योर्तिलिंग शिवमंदिर आहे. भारतातील प्रवासी या ठिकाणी श्रद्धेने येतात. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. एक पुराण प्रसिद्ध ठिकाण व महत्त्वाचे तिर्थक्षेत्र म्हणूनही औंढ्यानागनाथ हे प्रसिद्ध आहे. तेथील शिवमंदिरात संतनामदेव गेले. तेथे विसोबा खेचर शिवपिंडीवर पाय ठेवून झोपल्याचे पाहून चकित झाले. नामदेवाचा भाव पाहण्यासाठी विसोबाने 'लिंगावरी ठेविला पाव' त्यावेळी नामदेव म्हणाले, तुम्ही दिसता तर सज्जन, पण तुमची ही रीत कळत नाही. अहो, तुम्ही आंधळे झालात काय ? देवावर पाय ठेवून निजलात. विसोबा खेचर म्हणाले, मी म्हातारा झालो आहे. नामदेवा, मला का शिणवितोस ? माझ्याने हे कष्ट होत नाहीत, तुझा देव मला कळत नाही, जेथे देव नसेल तेथे माझे पाय उचलून ठेव. नामदेव विसोबांचे पाय शिवपिंडीवरून उचलून जेथे जेथे ठेवू लागले तेव्हा तेथे विसोबाचे पायाखाली पिंड दिसू लागली. तेव्हा विसोबा खेचरांनी नामदेवास सांगितले की, ''देवाविणा ठाव कोठे रिता नाही.'' तेव्हा सद्‌गद होऊन नामदेवांनी विसोबाचे चरणी मिठी घालून गुरुदक्षिणा देण्याची विनंती केली.

"इतुकें देखोनि चरणीं घाली मिठी । सांठवला सृष्टी अवघा देव ।।१।।
तिहीं त्रिभुवनीं आपण व्यापूनी । आनंदें कोंडोनि राहियेला ।।२।।
श्रीगुरुचे पाय जीवें न विसंबत । मनोवृत्तिसहित ओवाळिलें ।।३।।
डोळियांचे डोळे उघडिलें जेणें । आनंदाचे लेणे लेवविलें ।।४।।
जन्ममरणांचे तोडिले सांकडे । कैवल्यचि पुढें दावियेले ।।५।।
कैवल्याचा गाभा विटेवरी उभा । दिसे दिव्य शोभा पांडुरंग ।।६।।
नामा म्हणे माझी भक्ति हे माऊली । कृपेची साऊली केली मज ।।७।।

संत नामदेव दर्शवितात की, माझे भक्तीची माऊली श्रीपांडुरंग[४] आज्ञेने मी विसोबा खेचर या संताकडे आलो त्यांनी मला गुरुदीक्षा दिली व परमात्मा सर्वात्मक आहे ज्ञान दिले

सर्वकाळी परमात्मा आहे सर्व देशी । भावना हे अर्हनिशी दृढ धरी ।।१।।
संत समुदाय मिळती जेथे जेथे । जायें तेथे लोटांगणी ।।२।।
चिंता न करीं नाम्या येणें तरसी जाणे तुज सांगितली खूण निर्वाणीची ।।३।।

देवाविण ठाव रिता नाही ही निर्वाणीची[५] खूण सांगितली व माझे डोळीयांचे डोळे उघडिले. आनंदाचे लेणेच माझे हाती दिले. जन्ममरणाचे साकर्डे तुटले व कैवल्याचा गाभा जो श्रीविठ्ठल त्यांचे दिव्य रूपाची खूण समाजावून दिली. असा विसोबा खेचरांनी मजवर अनुग्रह केला. निर्गुण निराकार परमेश्वरच सगुण रूपात साकारला आहे. त्या ईश्वरनामाचे सामर्थ्य अगाध आहे. ते नाम दृढ धरि त्याने प्रपंचाची आस जाण सुपुष्टात येईल. पापराशी भस्म होतील. मन "अमन" होईल. नाम महिमा सतत गायिल्याने ईश्वर जे सडे असतील त्यांना पेठे बांधून पैलतीरी नेईल. कुटुंबियांना नावेत चढवून भक्तांचे प्रेमापोटी पैलतीरी नेईल. अशाप्रकाराचा बोध नामदेवास विसोबाखेचरांनी केला. उपदेश व गुरुदीक्षा प्रकरण शासकीय नामदेव

गाथ्यात संत नामदेवांचे आत्मनिवेदन अभंग क्र. १३४८ ते १३७९ यात दिलेल आहे. हे संत नामदेवांनी आपल्या अध्यात्मिक परमात्मा अनुभूतीचे परिवर्तनाचे चित्र यातून स्पष्ट केले आहे. नामदेवांचे अध्यात्मिक आत्मचरित्रच आहे. कारण संतनामदेवांनी स्वतः आपल्या आत्मचरित्रात सांगितले आहे की, मला विसोबा खेचरांनी औढ्यागांवी नागनाथ मंदिरात उपदेश केला आहे. सर्व संतानी सगुण भक्तीतूनच निर्गुणाचा शोध घेतलेला आहे. सगुण भक्तीचे प्रतीक श्रीविठ्ठल हा संताचा आत्मा आहे. संतनामदेवापासून आत्तापर्यंत वारकरी संप्रदायाने श्रीविठ्ठल आराध्यदैवत मानलेले आहे.

(संत नामदेवास गुरूपदेश कृतकृत्य केले) त्यानंतर त्यांनी औंढ्यानागनाथ येथे आपला आयुष्याचा काळ व्यतीत केला. परंतु त्यांनी आपली आयुष्य मर्यादा जवळ आली हे ओळखून आळंदीस प्रस्थान केले. आत्मज्ञानी संत पुरुषांना आपली इहलोकीची यात्रा केव्हा संपणार याची निश्चित जाणीव होते. संतज्ञानदेव, नामदेव, विसोबा खेचर निवृत्ती आदि संतांचे समाधी निर्णय काळ त्यांनी आगोदार निवेदिले होते. तसेच विसोबा खेचरांनी आळंदी येथे समाधी घेतली. त्याबद्दल त्यांनी आधीच लिहून ठेवलेला अभंग आहे. त्यात त्यांनी श्रावण शुद्ध एकादशी बाराशे एकतीस. हा त्यांचा समाधीकाळ होय.

विमानांची दाटी पुष्पांचा वर्षाव । अप्सरा गंधर्व नाचताती ।।
अलंकारपुर इंद्रायणी तिरी । मनी ज्ञानेश्वर आठविली ।।
मग आठविला पंढरीचा साव । देवाधिदेव पांडुरंग ।।
सौम्य संवत्सर बाराशे एकतीस शुद्ध श्रावणास एकादशी ।।
निर्गुण निराकार स्वरूपी मिळाला । खेचर बसला समाधीसी ।।

**३) संत ज्ञानदेवादि संताच्या समवेत केलेल्या तीर्थयात्रेतील अनुभवांचे चित्रण..**

संत नामदेवांना ज्ञानप्राप्ती झाल्यावर संत ज्ञानेश्वरांच्या प्रेरणेने व आग्रहाने त्यांनी त्यांच्या सोबत तीर्थयात्रा केली. दोन जीवाभावाच्या आध्यात्मिक सवंगड्यांनी एकमेकांच्या सहवासाचे सुख लुटण्यासाठी

केलेल्या या प्रवासात त्यांच्या उत्कट हृदयसंवाद होत राहिला. हा भक्तिविषयक हृदयसंवाद हे 'तीर्थविळी' च्या अभंगांचे मोठे आकर्षण आहे. संत ज्ञानदेवदि संतांबरोबर नामदेवांनी उत्तरेकडील पहिली तीर्थयात्रा शके १२१३ ते १२१८ च्या दरम्यान केली. या तीर्थयात्रेत संत गोराकुंभार, परिसा भागवत, विसोबा खेचर, निवृत्तिनाथदि भावंडे व अनेक वारकरी संत श्रेष्ठाही त्यांच्या बरोबर होते. त्यांतच 'ज्ञानियांचे राजे' संत ज्ञानेश्वरही असल्यामुळे उत्तर भारतात ह्या संतांच्या सामुदयिक प्रभाव पडला. त्यामुळेच नाभादासांच्या 'भक्तिमालेत' ह्यापैकी बऱ्याच संतांची चरित्रे वर्णिलेली आहेत.

संत नामदेव हे मराठी भाषेतील पहिले आत्मचरित्रकार होत. त्याकाळी कोणी लौकिक चरित्र लिहिण्याची प्रथा नव्हती, तरी नामदेवांनी आपल्या लौकिक चरित्रातील काही महत्त्वाचे प्रसंग आपल्या आत्मपर अभंगात विस्ताराने वर्णिले आहेत. त्यापैकी "कच्चे मडके" म्हणून संतमंडळाने केलेली त्यांची संभावना आणि गुरूभेटीमधील अव्दैतानुभवाची प्रचीती हे दोन प्रसंग 'तीर्थावळी' चा संदर्भ म्हणून महत्त्वाचे आहेत. संत ज्ञानदेवांची भेट आणि विसोबांची केलेले मार्गदर्शन यांमुळे नामदेवांच्या पारमार्थिक जीवनाला संपन्नता आणि परिपूर्णता आली. त्या आनंदोल्हासात मग्न असतानाच त्यांनी व ज्ञानदेवांनी इतर संतमंडळींना सोबत घेऊन तीर्थयात्रा केली. (संत ज्ञानदेवांची नामदेवांची भेटीस पंढरपुरास आले) 'नामदेवाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटंगण घातले नामदेव' नामदेवांनी ज्ञानदेवाची यथाविधी पूजा करून अलिंगन दिले व भेटीचा आनंद व्यक्त केला. दोघांनी एकमेकाची स्तुती केली व ज्ञानदेवांनी भेटीचा हेतू सांगितला.

"भूतळींची तीर्थ पहावी नयनी । असे आर्त मनीं आहे मज ॥
तुझिये, संगतीचे नित्य सुख घ्यावे । सार्थक करावे संसाराची ॥
ऐसी उत्कंठा बहुत माझे पोटी । भाग्ये आली भेटी तुज आजी ॥
ज्ञानदेव म्हणे पुरवी मनो रथ । करावा मुहूर्त प्रयाणासी ॥ "

असा प्रस्ताव, ज्ञानदेवांनी नामदेवा पुढे मांडला तेव्हा । नामदेवांनी ज्ञानदेवास सांगितले की,

तुम्ही विठोबाची आज्ञा घ्या

'नामाम्हणे स्वामी विठोबासी पुसा । आज्ञा देईल शिरसा धरि त्याची ।।

संत नामदेव जीवनमुक्त होते तरी विठ्ठल परमब्रह्मांप्रती त्यांचा जिव्हाळा किती जाज्वल्य होता यांचे येथे दर्शन घडते. श्रीविठ्ठल आज्ञेने ते दोन्ही जीवनमुक्त संत तीर्थयात्रेस निघाले.

'जीवे स्वस्ति क्षेत्र यावे शीघ्रवत । करावे स्वहित कळेल तैसे ।१

नामदेव माझा जीविचा जिव्हाळा आहे त्यास सांभाळून ने आणि सांभाळून आण हे कृपेचे पोसणे माझे आवडते आहे. 'क्षण जीवास परते न करी करा ।' ही आठवण चित्ती असो द्यावी असे ज्ञानदेवास विठ्ठलाने बजावून सांगितले. श्रीविठ्ठलाच्या आशीर्वाद घेऊन चंद्रस्नान करून पुंडलिकाचे दर्शन घेऊन दोघांनी यात्रेचे प्रस्थान केले. तेव्हा विठ्ठल रूक्मिणीला दुःख तसेच नामदेवासही दुःख झाले.तसेच तीर्थयात्रेला प्रारंभ करण्यापूर्वी श्रीविठ्ठलाचा निरोप घेताना नामदेवांच्या मनात जी कालवाकालव झाली आणि नामदेवाच्या विरहाच्या कल्पेनेने विठ्ठलालाही जो गहिवर आला, त्या प्रसंगाचे हृदयस्पर्शी वर्णन 'तीर्थावळी' मध्ये पहावयास सापडते. अखेरीख संत ज्ञानदेवांच्या आग्रहाने ते तीर्थयात्रेला निघाले. त्यांचे हे भक्तिभ्रमण चालू असताना प्रभासतीर्थाजवळ ज्ञानदेवांचा , योगमार्ग आणि नामदेवांचा भक्तिमार्ग यांचे दर्शन घडविणारा जो प्रसंग घडला, तोही नामदेवांनी वर्णन केला आहे. संत ज्ञानदेवांनी आपल्या योग बळाने सूक्ष्मरूपधारण करून विहिरीच्या तळाशी जाऊन आपली तहान भागविली, तर नामदेवांनी आपल्या आर्त भक्तिप्रेमाच्या बळावर पाण्याचा प्रवाहच वर खेचून आणला असा तो प्रसंग आहे. किंबहुना या वर्णनाच्या व्दारा, योगमार्ग कष्ट साध्य व त्या योग्यापुरताच उपयुक्त ठरणारा तर भक्तिमार्ग सुलभ व सर्व भूतमात्रांचे हित साधणारा आहे, असा निष्कर्ष नामदेवांनी सूचित केला आहे.

तीर्थवळीच्या अभंगात एका ठिकाणी ज्ञानदेव आणि नामदेव यांचा संवाद आला आहे. यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे उत्कृष्ट आविष्करण झाले आहे. तीर्थयात्रेला निघालेल्या नामदेवांची पावले मार्गावरून पुढे

पडत आहेत, परंतू त्यांचे चित्त मात्र पंढरीकडे धाव घेत आहे.

'क्षणा क्षणा वास परतोनी पाहें । वियोग न साहे पंढरीचा ।।'

संत नामदेवांच्या चित्ताची व्याकुळ अवस्था पाहून संत ज्ञानदेव तत्त्वबोधाच्या व्दारे त्याचे समाधान करू पाहत आहेत. ''तुझा सुखानंद तुझ्याजवळ असताना खंत करण्याचे तुला कारणच काय?'' असे ज्ञानदेवांनी म्हटल्याबरोबर मला ज्ञानगती माहीत नाही. मला योगमुक्ती माहित नाही, एका विठ्ठलावाचून दुसरीकडे कोठेही माझे मन स्थिर होऊ शकत नाही,'' असे नामदेव म्हणाले. ''श्री विठ्ठल विश्वाव्यापक असल्यामुळे त्याचे अस्तित्त्व सर्वत्र आहे. भेदभ्रम सोडून दिल्याबरोबर विठ्ठलाची ही सर्वात्मकता तुझ्या ध्यानात येईल. आकाश ज्याप्रमाणे सर्वत्र असेत, त्याप्रमाणे 'श्रीविठ्ठल' सर्वत्र भरुन राहिला आहे.'' असा ज्ञानदेवांनी पुन्हा बोध केला. तरी त्यांचे समाधान होत नाही. अक्षर अव्यक्त आणि देशकाळ रहित असे जे तत्त्व आहे. त्याच्यांशी एकरूप होण्याचा ज्ञानी पुरुष प्रयत्न करीत असतात. या विचाराचाही नामदेवांच्या चित्तावर प्रभाव पडत नाही.

''सर्वसुख मज आहे त्याचे पायी । आणिकांच्या वार्टी न पडे कदा ।।

तेथे माझें मन रंगलेसे भावें । सुख येणे जीवें देखिले डोळां ।।

ईश्वर सर्वगत आहे, संपूर्ण आहे, त्याला आदी नाही आणि अंत नाही, तो तुझ्या ठायी आहे आणि तू त्याच्या ठिकाणी आहेस, हा तत्त्वबोधही नामदेवांचे चित्त ठिकाणावर आणण्यास असमर्थ ठरला.

''मी न मनीं न मनीं लटिकी हे कहाणी । परि जळधरा वाचोनि चातक जैसा ।।

तैसें माझें मन स्मरे रात्रंदिवस । पंढरी निवास जीवन माझें ।।''

संत नामदेवांचा हा 'एकविध' भावपाहून ज्ञानेदवही स्तिमित झाले. भक्तीच्या क्षेत्रात नामदेवांनी प्राप्त करून घेतलेल्या समृद्ध अनुभवांची आपणही जोड करून घ्यावी, अशी त्यांना इच्छा उत्पन्न झाली आणि त्यांनी नामदेवांची विनवणी केली, असा 'तीर्थवळी' प्रकरणात एका अभंगात उल्लेख आहे. (सकलसंतगाथा

अ.क्र. ९२३) अशा या भक्तिमार्गाचे मर्म आपल्यालाही समजावे संतज्ञानदेव संतनामदेवांना म्हणतात, "सांगे हा अनुभव साधन उपावो । विनवी ज्ञानदेवो नामयासी ॥" त्यावेळी नामदेवांचा कंठ दाटून आला, आणि त्यांनी ज्ञानेश्वरांच्या चरणांना मिठी घातली. ज्ञानदेव आपले 'कवतुक' करत आहेत याची नामदेवांना पूर्ण जाणीव होती. ज्ञानदेवांचे मागणे नामदेवांना कृपणाच्या घरी कल्पतरूने यावे असा हा प्रकार होय. असे वाटते यातून दोघाही संत महात्म्याचे भक्तिसाम्राज्यातील अलौकिक श्रेष्ठत्वच यातून स्पष्ट होते. संत नामदेवांची जीवननिष्ठा व संतज्ञानेश्वराविषशीचा अत्यंतिक जिव्हाळा व्यक्त होतो.

संत नामदेवांच्या भेटीचा क्षण संत ज्ञानेश्वरांच्या आयुष्यात भाग्याचा ठरला आणि उलट संत ज्ञानेश्वरांचे दर्शन होताच नामदेवांनी स्वतःला धन्य मानले, कृतार्थ मानले. आपली पूर्ण पुण्याई म्हणूनच अशा लोकात्तर अवतारी पुरूषांचे दर्शन होण्याचा योग आला, ही नामदेवांची भावना आहे. संसारातील क्षुद्र गोष्टींमध्ये ज्यांचे चित्त सदैव गुंतलेले असते. आणि ज्यांना कसलेही उच्च अभिलाषा नसते, अशा सामान्य, जीवांचा उद्धार करण्यासाठी अवतार धारण केलेल्या ज्ञानेश्वरांच्या 'चरणांचा आधार' मिळाल्यामुळे भवनदीच्या पैलपारी जाण्याचा नामदेवांना धीर आला आहे. संत ज्ञानेश्वरांविषयीचा कृतज्ञतेने ज्यांचे चित्त भारावून गेले होते. अशा भावनाप्रधान नामदेवांच्या मुखातून ज्ञानेश्वरांविषयीची आर्त भावना पुढीलप्रमाणे प्रकट झाली.

"नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामदेवें ॥१॥
देऊनि अलिंगन प्रिती पडिभरें । पूजिलें आदरें यथाविधी ॥२॥
धन्य तो अवसरू संत समागमु । करितसे संभ्रमु आवडीचा ॥३॥
नामदेव म्हणे सफल माझे जीणें । स्वामीच्या दर्शनें धन्य झालो ॥४॥

'तीर्थावळी' हे ज्ञानेश्वरांच्या चरित्रातील प्रवासाचे चित्र आहे. ही तीर्थयात्रा ज्ञानेदवांनी नामदेवासोबत केली. त्यामुळे, नामदेव हे या चित्रातील एक भाग आहेत. शिवाय ते स्वतः प्रसंगांचे कथनही करीत आहेत. या दोन संतांचा हा भक्तिविषयक हृदयसंवाद म्हणजे ज्ञान व भक्ती यांचा त्यांनी साधलेला समन्वय आहे.

श्रीविठ्ठलाच्या नामदेवावरील प्रेमाने तर भावचित्रांचे सौंदर्य अप्रतिम बनले आहे.(संत नामदेवांनी आपले भक्तिमहात्म्य सांगताना म्हणले आहे की,) मला 'भजनांत' गोडी वाटते. निर्वीकाराचे 'ध्यान' करताना हरिणी जशी नादावर लुब्ध होते देहभान विसरुन तल्लीन होते तशी मनाची तल्लीनता म्हणजे श्रवण होय. श्रेष्ठ कनिष्ठ न बघता नम्रता असावी. कृपण मनुष्य ज्याप्रमाणे व्यवसायात सतत लाभाचा विचार करतो तसा सत्त्वशीलपणे स्वहिताचा विचार करणे म्हणजे 'मनन' होय. सर्वभूती त्याला पाहणे याला 'निजध्यारून' म्हणतात. सर्व ठिकाणी एकच परब्रम्ह हीच 'भक्ती' एकनिष्ठेने वैराग्मवृत्ती पाळीली ही निर्विकार धृति होय. मनवासना विरहित करून संकल्प विकत्त्वाचा त्यागकरून एकांतात एक चित्ताने गोविंदाचे भजन सातत्याने करावे. गोविंदाचे भेटीची आस तुटू देऊ नये म्हणजे गोविंदाची अनुभती प्रप्त होते हीच विश्रांती होय.(अशा या, भज, नम्रता, ध्यान, श्रवण मनन, निजीध्यासन भक्ति, निर्विकार धृति व विश्रांती, अशा नवविघशलंकार मंडित सौंदर्य खाण भक्तीचे वैभव नामदेवानी सांगून ज्ञानदेवांची अपेक्षा पूर्ण केली.) (नामदेवांनी सत्त्वशील, भावमाधुर भावकोमल आदर्श असा अनुभवसिद्ध भक्तीचा नवरत्न हार ज्ञानदेवास अर्पण संत ज्ञानदेवासही नामदेवाचे भक्तिवैभवाची खोळी जाणून घ्यावयाची होती.)नामदेवाचे हे अनुभविसिद्ध भक्तिसुख जाणून ज्ञानदेव तृप्त झाले ततक्षणी थोरमनाने त्यांनी नामदेवाची मनःपूर्वक प्रशंसा केली.

"भक्त भागवत बहुसाल ऐकिले । बहू होऊनि गेले होती पुढे ॥१॥
परि नामयाचे बोलणे नव्हे हे कवित्त्व । हा रस अदभुत निरूपमु ॥२॥
हे सुख विश्रांती नाही हो कल्पांती । विचारावे संती दूर दृष्टि ॥३॥

अशा शब्दात नामदेवांचा गौरव केला. नामदेवांच्या कवित्त्वातून मिळणारा हा आनंद कल्पनातीत असून शास्त्रज्ञ कर्म निष्ठ कलावंत, आत्मज्ञांनी, योगयुक्त, शास्त्रवेत्ते, बुद्धिवंत श्रोते कवी, चतुर वक्ते, पाठक, साधक योगयुक्त, जीवनमुक्त आणि रूक्मिणींचा नाथ असलेल्या पंढरीनाथानेही हे जाणले आहे अशी मुक्तकंठाने संत ज्ञानेश्वरांनी नामदेवांची प्रशंसा केली आहे. कारण थोरांचे गुण थोरच जाणे. यात संत

ज्ञानदेवांचेही गंगेच्या पाण्यासारखे पवित्र व विशुद्ध मनाची खोली दिसून येते.

यो दोन्ही संतांचा तीर्थ यात्रेतील सुखसंवाद परमार्थमागीतील ब्रह्मरसामृत जनजागरणासाठी उपयुक्त ठरला आहे ही भक्ताची जोडी सर्व संतासह परत पंढरपुरी आले तेव्हा प्रथम नामदेव श्री विठ्ठलास भेटतात. नामदेवाची विठ्ठलाची विरह व्याकुळता दर्शविली आहे. विठ्ठलाची व इतर संताची भेटीअंती यात्रा उद्यापनाच कल्पना व विठ्ठल कृपेने परिपूर्णता मावंद्याचे सोहळ्याचे ब्राह्मणास निमंत्रण इतर पूजाविधी श्री विठ्ठलाचा वाद, सर्वात्मक परमेश्वर व सर्व सम भावाची ब्राम्हणास जाणीव मावंद्याची सांगता शेवटी नाम हे वेदाचे सार सांगून नामदेवाचे नाममहिमेचे श्रेष्ठत्त्व सिद्ध झाले. श्री विठ्ठलानेच स्वतः यजमान पदस्विकारलेने पंढरपुरच्या ब्रह्म वृन्दाला निमंत्रणे दिली आणि राही रखुमाई ऋद्धीस नेला या समारंभाचे निमित्त करून पांडुरंगाने तेथील मंडळींना हे पटवून दिले की, परमेश्वरासमोर सारे वर्ण सारखेच आहेत आणि भक्तीपेक्षा उत्कट भक्तिभावाने परमेश्वराला आळवणाऱ्या भक्तालाच परमेश्वर वश होतो आपल्या कृतीने दाखविणे हाच त्या मावंद्याचा हेतू होता.

'भक्ति गा येथ सरे । जति अप्रमाण ।' किंवा

'भावाचे पाहुणे । भलतेया ।।'

या संत ज्ञानदेवांच्या वाचनाचा साक्षांत प्रत्यय येतो. शेवटी संतनामदेवाने ५९ अभंगात सर्वानाच भगवंताचे ' नामाचे सार सांगितले आहे असे स्पष्ट होते.

## ४) संत ज्ञानदेव आणि त्यांची भावंडे यांच्या समाधिप्रसंगाचे भावपूर्ण चित्रण..

### संत ज्ञानदेवांची समाधी :-

संत नामदेव व संत ज्ञानेश्वर तीर्थयात्रेहून पंढरपूरास परत आल्यावर संतांचा मेळावा होऊन यात्रेचे उद्यापन झाले. या मेळाव्यात संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई

व संत चांगदेव, नरहरी सोनार, गोरा कुंभार, सावता माळी, संत जनाबाई, संत चोखामेळा, सका बंका, जगमित्र नागा जोगा परमानंद ही सर्व भक्त मंडळी होती. संत ज्ञानेश्वरांनी आपण समाधी घेणार आहोत हे या मंडळीत जाहीर केले. त्यावेळी संत ज्ञानदेवांच्या मधुर संगतीत नामदेवांच्या जीवनातील जो काळ व्यतीत झाला त्याची लवकरच समाप्ती झाली. कारण ज्ञानदेव सारख अलोकिक ग्रंथ मागे मागे ठेवून आणि भागवत धर्माच्या प्रचाराची प्रेरणा नामदेवांच्या अंतकरणात निर्माण करून ज्ञानदेवी कृतकृत्य झाले. आणि आपले अवतार कार्य संपले, अशा जाणिवेने त्यांनी संजीवन समाधी घेण्याचा मनोदय व्यक्त केला. अनेक दिवसाच्या निकट सहजीवनाने नामदेव व ज्ञानदेव यांच्यात जी निस्सीम जवळीक निर्माण झाली होती, ती पाहता ज्ञानदेवांच्या चिरविरहाच्या कल्पेनेने नामदेवांच्या कोमल अंतःकरणात केवढा कल्लोळ निर्माण झाला असेल, याची कल्पनाच केलेली बरी. ज्ञानदेवाची

थोरवी त्यांनी किती मुक्त कंठाने सांगितली होती ।

"ज्ञानदेव ज्ञानसागरू । ज्ञानदेव ज्ञान गुरु ।।

ज्ञानदेव भविसिंधुतारू । प्रत्यक्ष रूपें पैं असे ।।"

अशी त्यांची श्रद्धा होती. परंतु ज्ञानदेवांचा निर्णय ठाम होता. कारण आपले कार्याची दिशा आपण श्री विठ्ठल आज्ञेने घेतो, अशी संताची धारणा होती. त्याप्रमाणे ज्ञानदेवांनी विठ्ठलास आपले गुज सांगितले व आज्ञा मागिती. श्री विठ्ठलाने आज्ञा दिली व समाधी इंद्रायणी काठी आळंदीस घ्यावी असे सुचविले. संतानी भूवैकुंठ म्हणून गौरविलेल्या अलंकापुरीत त्यावेळची सारी संतमंडळी समाधिसोहळा पाहण्यात एकत्रित झाली.

भजन, कीर्तन व नामस्मरण अशा उपासनेत अखंड एकत्र राहून सर्वांनी ज्ञानदेवांना डोळेभरून पाहून घेतले. भूतलावर प्रकट झालेला तो कैवल्यांचा पुतळा पुन्हा दृष्टीस पडणार नाही, म्हणून नामदेव व इतर संत शोकाकुल झाले. दुःखाने विव्हळ झालेल्या या साऱ्या प्रेमलाचा निरोप घेऊन "संत ज्ञानदेवाच्या कार्तिक

वद्य त्रयोदशी, शके १२१८ गुरुवार या दिवशी मध्यान्हकाळी श्री क्षेत्र आळंदी येथे समाधिस्थ झाले" [१] संत नामदेवांच्या दृष्टीने हा प्रसंग सर्वात महत्त्वाचा होता. नामदेवकृत ज्ञानदेव चरित्राची समाप्ती या 'समाधी' प्रकरणाने होते. गाथ्यामध्ये 'श्री ज्ञानेश्वर समाधिमहिमा' आणि 'श्री ज्ञानेश्वर महाराजांची समाधी' अशी दोन प्रकरणे आढळतात त्यांत अभंगाची सरामिसळही झाला आहे. दोन्ही मिळून २६६ अभंग आहेत. या प्रकरणात नामदेवांनी आपला आत्मा ओतला आहे. ज्ञानदेवांशी नामदेव किती समरस झाले होते, एका श्रेष्ठ संताने समाधी घेतल्यानंतर दुसऱ्या त्याच दर्जाच्या संताच्या जीवनात कशी पोकळी निर्माण होते, त्याचा अंतरात्मा कसा लवतो, याचे सुस्पष्ट दर्शन या प्रकरणात घडते. व्यक्तिप्रसंग – चित्रणकौशल्य, रसवत्ता, भाषाप्रभुत्व, कलात्मक सुसंगती, आदी सर्वच वाङ्मयीन गुणांनी नामदेवांचे हे 'समाधी प्रकरण'मराठी वाङ्मयात तरी अपूर्व आहे. संत ज्ञानदेवांचे कर्तृत्व प्रथम येथे मनावर बिंबवले जाते. त्या कर्तृत्वाचा धनी समाधिस्थ होतो. त्याच्या वियोगाने चराचर सृष्टी दुःखसागरात बुडून जाते. त्या समाधिमहोत्सवासाठी उसळलेला ती संताची गर्दी नजर समोर उभी राहते आणि ज्ञानदेवही ज्यांना गुरू म्हणत, ते त्यांचे जेष्ठ बंधू मुकेपणाने दुःख व्यक्त करीत आहेत. सोपान मुक्ता स्फुंदन आहेत, या सर्वच वर्णनात प्रत्यक्ष अवलोकनाची प्रचीती येते. ज्ञानदेवांच्या कर्तृत्वासंबंधी प्रबंध – रचना करूनही जे सांगता येणार नाहीत, ते अभंगरचना करून नामदेवांनी साध्या, सहज आणि नेमक्या सूत्रमय शब्दांत सांगितले आहे.

"काय सांगों देवा ज्ञानोबाची, ख्याती । वेद म्हैशामुखी वदविले ।।
अविद्या मायेचा लागो नेदी वारा । ऐसे जगदोद्धारे बोलविले ।।
नामा म्हणे त्यांनी तारिले पतित । भक्ति केली ख्यात ज्ञानदेवे ।।
अनुभव हा सागर गुह्य आणि ब्रह्म । उघडें अध्यात्म बोलियेले ।।
प्रकट हें गुह्य उकलिले गबाळ । केले करतळमळ ज्ञानयाने ।।
कोणाची कल्पना नुरेची बा येथे । उघडा गुह्यार्थ सिद्ध केला ।।

करणे न करणे सांगितला पंथ । तिही लोकी कीर्त वाढविली ॥

अहंकार पोटाचे उतरिले जहर । केला उपकार जगामाजी ॥

या सामर्थ्यवान शब्दांत संशयाचे कोभ करपवून टाकणाऱ्या आणि वैकुंठाला शिडी लावणाऱ्या ज्ञानदेवांचे कर्तृत्व नामदेवांनी सारांशरूपाने सांगितले आहे. पंढरीचा पोहा आळंदीला आला. समाधीचा महोत्सव सिद्‌ध झाला. सिध्देश्वराशेजारीच ती इंद्रायणी, साडेतीन पावले उत्तरायणी टाकून समाधीची निश्चित केलेली ती जागा आदी सर्वाचेच वर्णन मोठे अप्रतिम आहे.

वोसंडोनि निवृत्ती आलिंगो लागला । आणिकांच्या डोळा अश्रु येती ॥

नामा म्हणे संत कासावीस सारे । लाविती पदर डोळियासी ॥

निवृत्तीदेव म्हणे करिता समाधान । काही केल्या मन राहत नाही ॥

बांधल्या तसयाचा (तळ्याच्या) फुटलासे पाट । ओघ बाप वाटा मुरडताती ॥

बांधल्या पेंडीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळ पांगले से ॥

हरिणीवीण खोपी पडियेली ओस । दशदिशा पाडस भ्रमताती ॥

मायबापे आम्हा त्यागियेले जेव्हा । ऐसे संकट तेव्हा झाले नाही ॥

नामा म्हणे देवा पेटला 'हुताशन' । करा समाधान निवृत्तीचे ॥

संत निवृत्ती राजांच्या या दुःखाचे वर्णन केवळ नामदेवच करू शकले । पण नामदेवाचीही तीच स्थिती आहे.

कोण जाणे माझे जीवीचा कल्पला । प्रेमाश्रु डोंळा लोटताती ॥

नामा म्हणे येथे बोलवेना मज । जात से निजगुज आवडीचे ॥

संत निवृत्तीनाथाप्रमाणे संत नामदेवाचीही अवस्था झाली ज्ञानदेवांच्या वियोगामुळे निवृत्तीला झालेल्या दुःखाचे वर्णन करताना नामदेव करुणरसाचे दुःखद चित्र सजीवपणे उभे करतात. योगिराज निवृत्तीचे ते

ओसंडून मिठी मारणे, त्याचे दुःख पाहून इतरांना अश्रू न आवरणे, आपल्या लाडक्या शिष्याचे निवृत्तीचे मन भरून केलेले अखेरचे गुणवर्णन,'आता ऐसे कोणी सखे नाही' हा त्याचा आर्त कळवळ्याचा उद्‌गार हे सारे हृदयाला भिडणारे असे आहे. बांधलेल्या तळ्याचा पाट फुटल्याने बारा वाटांनी मुडणारे ओघ, पेंढीचा आळा सुटल्याने रानोमाळ विखुरलेले गवत, खोपी मध्ये हरिणी न परतल्याने दशदिशा भटकणारी पाडसे अशा समर्पक दृष्टांतांनी निवृत्तीचे दुःख नामदेवांनी अगदी परिणामकारकपणे व्यक्त केले आहे. आईवडिलांनी त्याग केला, तेव्हाही इतके दुःख झाले नव्हते ही निवृत्तीची कबुली विशेष उत्कंट आहे.

देव निवृत्ती यांनी धरिले दोन्ही कर । जातो ज्ञानेश्वर समाधीसी ॥१॥
नदीचिया माशा घातले माजवण । तैसे जनवन काळवले ॥२॥
दाही दिशा धुंद उदया स्तााविण । तैसेचि गगन कालवले ॥३॥
जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढे ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥४॥
ज्ञानदेव म्हणे सुखी केले देव । पादपद्मी ठेवा निरंतर ॥५॥
तीन वेळा जेव्हा जोडिले करकमळ । झाकियेले डोळे ज्ञानदेव ॥६॥
भीममुद्रा डोळा निरंजनी लीन । जाले ब्रम्हपूर्ण ज्ञानदेव ॥७॥
नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ॥८॥ [१०]

संत ज्ञानेश्वर जेव्हा समाधीच्या जागेकडे पावले टाकू लागले, तेव्हा नदीतल्या माशांप्रमाणे जनांचा समुदाय खळवळ करू लागला. दिशा धुंद झाल्या होत्या. आकाश कालवळे होते. एका सार्वत्रिक दुःखाचे गडद वातावरण या सर्व वर्णनातून संत नामदेवांनी उभे केलेले आहे. संत ज्ञानेश्वरांच्या डोळ्यासमोर निरंजनाचे मैदान पसरले, तर नामदेवांना सूर्य बुडाल्याची जाणीव होऊ लागली. एकूणच समाधिप्रसंगाच्या ज्ञानदेवांच्या निरंजन आत्मतृप्त अवस्थेचे वर्णन नामदेवांनी अगदी भारावून केले आहे. या प्रकरणात करुण, भक्ती आणि उदात्त रसांची त्रिवेणी महापूर घेऊन वाहत आहे नामदेवकृत ज्ञानदेवांच्या या

त्रिप्रकरणात्मक चरित्रात परिणामाच्या दृष्टीने 'समाधी' हे प्रकरण सर्वश्रेष्ठ उतरले आहे.

**संत सोपानदेवांची समाधी :–**

संत ज्ञानदेवांच्या समाधीनंतर लगोलग मार्गशीष वद्य त्रयोदशी शके १२१८ रोजी कऱ्हा नदीच्या तीरावर सासवड गावी सोपानदेवांनी समाधी घेतली. नामदेवांनी हा समाधीचा प्रसंग चाळीस एक अभंगात प्रत्ययकारक पद्धतीने निवेदन केला आहे.

देव म्हणे नाम्या मार्गशीष गाढा । जावें सासुवडा उत्सवासी ॥

सोपानासी आम्ही दिधले वचन । चला अवघेजन समुदाय ॥

हा श्री विठ्ठलाचा आदेश घेऊन संत मंदियाळी सोपान समाधिस्थळी आली आहे. तुळसी, बुक्का, बेल, दर्भ आणि फुले या पूजा द्रव्यांनी समाधीची जागा सजविली आहे.

निशीदिनी कीर्तन केले व्दादशी । वद्य त्रयोदशी मार्गशीष ॥

भोगावती केले अवघ्यानी स्नान । चालिले सोपान समाधीसी ॥

सोपानदेवे ग्रंथ केला होता सार । ठेविला समोर निवृत्तीच्या ॥

शेष भावंडांचा आणि इतर सुहृदांचा कायमचा निरोप घेऊन सोपानदेव निघालेले आहेत. ऐहिकाच्या अखेरच्या सीमेवर त्यांचे पाऊल क्षणभरच घोटाळले आहे.

अंतरीचे जाणत बा पंढरीनाथ । आले अश्रुपात सोपानासी ॥

पण दुसऱ्याच क्षणी पारलौकिकाच्या परिसरात त्यांनी " झाकियेले डोळे ब्रहमबोधे । " या अवस्थेत प्रवेश केला आहे. समाधीला शिळा घातली गेली आहे. निवृत्ती आणि मुक्ताई यांच्या वाट्याला आलेला हा दुसरा समाधिप्रसंग

निवृत्ती मुक्ताईने वरिली समाधि । देहभान शुद्धी हरविली ॥

अशी व्याकुळ अवस्था या दोघा भावंडांची झाली आहे. 'दीर्घध्वनी करी नामदेव ।' असे आत्मवर्णन

नामदेवांनी केले आहे.

**संत मुक्ताबाईची समाधी**

संत ज्ञानदेव आणि सोपानदेव यांच्या समाधीमुळे मुक्ताबाईचे मनही कैवल्याच्या हाकेसाठी आर्त झाले आहे.

मुक्ताई उदासी झाली असे फार । आतां हे शरीर रक्षूं नये ॥

अशा मनःस्थितीत 'वद्य वैशाख मास दशमी निर्मल' पाहून शके १२१९ मध्ये मुक्ताबाई स्वरूपी सहज मिळून गेली आहे.

तापाचिये तीरीं महत् ग्राम थोर । असे सोमेश्वर पुरातन ॥

असा मुक्ताईच्या समाधिग्रामाचा उल्लेख नामदेव करतात. डॉ. तुळपुळे यांनी तापीतीरावरील 'मेहूण' या गावचा निर्देश समाधिस्थान म्हणून केलेला आहे.

संत मुक्ताबाईची "समाधी" त्यांच्या इतर भांवडापेक्षा वेगळ्या पद्धतीने साधली आहे. संत नामदेवांनी त्यांच्या समाधिप्रसंगाचे दर्शन पुढील शब्दांत घडविले आहे.

कडाडली वीज निरांजनी जेव्हां । मुक्ताबाई तेव्हां गुप्त झाली ॥

वैकुंठी लक्ष घंटा वाजती एक घाई । झाली मुक्ताबाई स्वरूपाकार ॥

एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनी । जेव्हां निरंजनी गुप्त झाली ॥

गेले निवारुनी आकाश आभुट । नामाम्हणे कोठें मुक्ताबाई ॥

मुक्ताबाईच्या या लौकिक विलक्षण समाधीची अनुभूती त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्या संत नामदेवांना प्राप्त झाली आहे.

**संत निवृत्तीनाथांची समाधी –**

जेष्ठाच्या आधीं कनिष्ठांचे जाणें । केलें नारायणें उफराटें ॥

उफराटें फार कळलें माझे मनी । वळचणीचें पाणी आढ्या गेले ॥

ही खंत या जेष्ठ बंधू निवृत्तीला मुक्ताईच्या समाधीनंतर अधिक तीव्रतेने जाणवू लागली. त्यामुळे 'गोदातीरी क्षेत्र । धन्य त्र्यंबकेश्वर ।।

ही जागा त्यांनी आपल्या समाधीसाठी निवडून जेष्ठ वद्य व्दादशी शके १२१९ ही समाधी तिथीही निश्चित केली. निवृत्तीनाथांची उर्वरितांचा निरोप घेण्याची सिद्धता केव्हाच झाली होती,

निवृत्ती देवें ग्रंथ केला होता सार । ठेविला समोर विठोबाच्या ।।

निवृत्तिराज बैसले समाधी सुचित । चिन्मय ते ज्योत उजळली ।।

नामयाच्या या परात्पर गुरूच्या समाधिप्रसंगी 'विठोबाचे हृदय आलेसें भरून' आणि राही रखुमाबाई बैसल्या गहिवरत' अशी अवस्था देवादिकांची झाली असल्याचे वर्णन नामदेव करतात. इतरांचा शोक तर वोसंडून वाहत होता.

या संतांच्या समाधिवर्णनाप्रमाणेच संत नामदेवांनी 'चांगदेवांच्या समाधीचे' वर्णन केले आहे. संत नामदेव लिखित सर्व समाधिप्रकरणांबाबतीत लिहावयाचे, तर 'करुणोत्कट' एवढा एक शब्दही खूप बोलून जाईल. आत्मानुभवाच्या स्पर्श या सर्वच प्रसंगांना झाल्यामुळे जातिवंत भावकाव्याचे गुण या अभंगात अवतरले आहेत. संत नामदेवांच्या अभंगांची असाधारण वाङ्मयीन उंची पुन्हा एकदा यातून प्रतीतीला येते. नामदेवांनी ज्ञानदेवाप्रमाणे, निवृत्ती, सोपान मुक्ताबाई, चांगदेव यांचेही समाधी अभंग गायिले आहेत. हा सर्व समाधी प्रकरणांचा भाव नामदेवांचे व ज्ञानदेवादि भावंडाचे आत्मवरित्राचा भाग होऊ शकतो. या समाधी प्रकरणातील सर्वच समाधी प्रकरणे करुणमय आहेत. करुणा व शांत रसाचे वातारवणात दुःखाची उद्विग्नताही आहे सर्व समाधी अभंग हृदय हेलावून टाकतात. हे अभंग हृदयाचा ठाव घेतात व वाचकाची शोकाकुल अवस्था होते. 'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट' त्याप्रमाणे नयनाश्रूंना आफळता येत नाही. 'ओघ बारा वाटा मुरडती । नयनाश्रूंनी गाल ओलेचिंब होऊन अश्रू खाली घरंगळतात. निवृत्तीनाथांच्या, भावंडाच्या वियोगाचे दुःखाची विरहव्यथा ,शोकाकुल स्थिती नामदेवांनी करुणमय व शोकाकुल अंतकरणाने उभी केली आहे. ज्ञानदेव गेले ज्ञानदीप लोपला. गेले दिगंबर ईश्वर विभूती । परमार्थ सोपानही गेले.

निष्काम योगी गेले चांगदेवही गेले. कडाडली वीज निरंजनी जेव्हा । मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ।। अवघ्या परिस कष्टी केले मुक्ताईने । काहीच बोलणे घडले नाही ।। या निवृत्तीनाथांच्या रुखरुखीचे शब्दचित्र, उफराटे फार पावले माझे मनी अशी निवृत्तीनाथांची अस्वस्थ अवस्था नामदेवांनी आपल्या काव्यातून उभी केली.

या संत नामदेवांच्या समाधी अभंगात सहृदयता कारुण्य, तसेच कोमल व गांभीर्य त्यातही निसर्ग सौंदर्य चित्राची बहर आहे.नामदेवाचे छंदयाची आर्तता वैकुंठाचे देव त्यात शब्द शब्दात जाणवतो. सहीत ॠषी, सुखर गंधर्वीची दाटी समाधीस्थळी आणून व विठ्ठलास पुरोहितांचे स्थान देऊन हा हृद्य हेलावून सोडणार प्रसंग नामदेवांनी काहीसा सुसह्य केला आहे.(नामदेवांनी आर्तता, कारुण्य, आणि विरूदध बाजूची खुमारी काव्यात वर्णिली आहे.) संत नामदेवकृत समाधीचे हे सर्वच अभंग फार सुंदर आहेत. ज्ञानदेव सारख्या ज्ञानी पुरुषाच्या समाधीचे नामदेवासारख्या प्रेमळ भक्ताने केलेले वर्णन म्हणजे जुन्या मराठी वाङ्मयोदधीतील एक अमूल्य रत्न आहे. हे सर्व अभंग प्रेम आणि करुण या रसांनी पूर्णपणे ओथंबलनेले आहेत. म्हणून श्रद्धाशील भाविक भक्तानी रसिकांनी ते सर्व अभंग एकदातरी लक्षपूर्वक वाचावेत असे हे नामदेवाचे आत्मानुभतीपूर्व अभंग आहेत. कारण " प्रत्यक्षानुभूतीचे इतके जिवंत चित्र मागाहून कोणी काढू शकणार नाही. अनुभूतीचा जिवंतपणा, देवसृष्टीचे समकालीन मानवी सृष्टीशी एकरूपत्व दाखविणारा कल्पनाविलास व भावमधुर भाषाशैली यांचा आल्हाददायक संगम येथे झालेला असल्यामुळे ही प्रकरणे संत नामदेवकृतच असली पाहिज."

**मान्यवरांची मते :- १) ह. भ. प. ल. रा. पांगारकर :-** संत नामदेवांनी समाधी प्रकरणात पाषाणाला पाझर फुटेल असे हृदयद्रावक वर्णन केले आहे हा कै. पागारकरांचा नामदेवाने लिहिलेल्या समाधी प्रकरणाचा अभिप्राय आहे.

**२) डॉ. अ. नी. देशपांडे :-** संत, ज्ञानेदव, सोपानदेव, चांगदेव, मुक्ताबाई आणि निवृत्तीनाथ यांच्या नामदेवरचित जे अभंग आहेत त्याचे स्वरूप चरित्रात्मकचे आहे. सगळीच समाधी प्रकरणे करुणोदात्त

आहेत. (प्राचीन म. वा. इतिहास पान नं. १०६)

**३) श्री. ह. श्री. शेणोलीकर :–** ज्ञानदेवांच्या समवेत केलेल्या तीर्थयात्रेची हकीकत स्वतः नामदेवांनी " तीर्थावळी प्रकरणात लिहून ठेवली आहे" नामदेवांनी ज्ञानेश्वरादि भावंडाचे चरित्र आदि समाधी तीर्थावळी या तीन ओळीबद्ध प्रकरणात ग्रथित केले आहे. प्रत्यक्षावलोकनाचा आधार या माहितीला असल्याने त्याचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे " हे निवेदन अत्यंत रसाळ उतरले आहे .

**४) डॉ. अशोक कामत :–** "नामदेवकृत ज्ञानदेवादि भावंडांचे चरित्र हे उपलब्ध असणारे प्रबळ ऐतिहासिक प्रमाण होय." ही पाच प्रकरणे एकसंघ वाटत नसली तरी ती नामदेवाच्या कवी व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत वाटणारी आणि सत्य घटना सांगणारी आहेत " "प्रभावी व्यक्तिरेखन, भाषेवरील अद्भूत अधिकार कालात्मक सौंदर्य इत्यादी गुणामुळे "ज्ञानदेवांची समाधी" हे नामदेव गाथ्यातील प्रकरण प्राचीन मराठी वाङ्मयातील श्रेष्ठकाव्य म्हणून आपल्यापुढे येते.

कार्तिक वद्य शके १२१८ रोजी आळंदी येथे वारकरी संत सज्जनांच्यासमोर ज्ञानदेवानी संजिवन समाधी घेतली. प्रत्यक्ष नामदेव व त्यांचे संत परिवारातील सारेजण समाधिस्थानी हजर होते. या अद्भुत प्रसंगाचे करुणगंभीर आणि प्रत्यकारी वर्णन नामदेवांनी सत्तर अभंगात सादर केले आहे. तीर्थावळी प्रकरणातही समाधी प्रकरणासंबंधीची या नामदेवकृत काव्यास नामदेवचरित्र लेखक संशोधकांची मान्यता प्राप्त असल्याचे दर्शविले आहे. नामदेवाची आहे तीर्थावळी व समाधी प्रकरणे नामदेवांनीच लिहिली आहेत. नामदेव अभ्यासक लेखकांचे दोनतीन आक्षेप वगळता या नामदेवकृत प्रकरणाशिवाय एवढे प्रत्ययकारी काव्य नामदेवाशिवाय सांगोपांगी नामदेवांचे हयातीत अथवा नामदेवाचे हयातीनंतर काही काळाने कोणी करू शकणार नाही हे बहुमान्य आहे.

तेराव्या शतकापासून चालत आलेल्या 'चरित्र – आत्मचरित्र' या लेखनाच्या परंपरेत नामदेवचरित्रांना विशेष महत्त्व आहे. नामदेवकृत 'ज्ञानेश्वरचरित्र' अतिशय वेगळेपणा लिहिले असून ते रसपूर्ण आहे. 'आदि' 'तीर्थावळी' आणि 'समाधी' ही तीन प्रकरणे या ज्ञानेश्वरचरित्राचे घटक आहेत. एकूण साडेतीनशे

अभंगांनी बनलेल्या या चरित्रात ज्ञानदेवांचा पूर्वजवृतांत, जन्म, बालपण, त्यांना सोसावी लागणारी निंदा, त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग, चमत्कार आणि समाधी प्रसंग वगैरे सर्व गोष्टीचे वर्णन नामदेवांनी केलेले आहे. हे वर्णन नामदेवांच्या सूक्ष्म अवलोकन शक्तीचा प्रत्यय घडवीत अतिशय हळूवारपणे प्रेमळपणे नामदेवांनी आपल्या भावनांचा आविष्कार घडविला आहे. यातही सत्याचा जराही आपलाप नामदेवांनी कोठेही होऊ दिला नाही त्यामुळे नामदेवकृत 'ज्ञानेश्वचरित्र' आणि अन्य संतांची चरित्रे अभंगाच्या माध्यमात लिहून एका नवीन परंपरेचा प्रारंभ केला, नामदेवांना मराठीतील पहिले पद्य चरित्रकार ठरविण्याचे कार्य या अभंगांनी केले आहे. नामदेव चरित्रलेखनाचे स्वरूप, प्रेरणा, प्रयोजन, उद्दिष्ट व प्रक्रिया या महानुभावीय चरित्र लेखनाहून वेगळ्या आहेत. नामदेवांच्या चरित्रलेखनाची प्रेरणा मुख्यतः भक्तीत हीच आहे. संताविषयीच्या भक्तिभावाने नामदेवांनी त्यांच्या चरित्रकथा लिहिलेल्या त्यांच्या मनाची जातकवृत्ती आहे. संताच्या किंवा परमेश्वराच्या कीर्तीचे गायन म्हणजेच भक्ती होय. असा निर्वाळा ज्ञानेश्वर चरित्राच्या प्रारंभी नामदेवांनी दिला आहे. आत्मचिंतनाबरोबरच प्रत्येक प्रसंगाच्या अखेरीस नामदेवांनी बोलकी प्रतिक्रिया येते ती अभ्यासण्यासरखी आहे नामदेवांनी 'आदि' मध्ये ज्ञानदेवांच्या चरित्राविषयक सामग्रीचे निवेदन केले व तीर्थावळी व समाधी ही प्रकरणे स्वतःच्या अनुभूतीना प्रमाण ठेऊन लिहिली अभंग हे चरित्रकथनाचे माध्यम नामदेवाने बनविले तेही इतक्या सहज की, त्यात अभंगरचनेचे श्रम जाणवत नाहीत प्रसंगाच्या उत्कंट भावनेबरोबर भाषा प्रतिमांचा व रूपकांचा आश्रय घेताना दिसते नामदेवांचे चरित्रलेखन वाचत असताना त्यात अनुभंव्या दोन पातळ्याजाणवतात एक प्रत्यक्ष वास्ताव आणि दुसरे स्वतःच्या भावसमार्थ्याने पातळ्यावर त्यांचे कविमन विहरताना दिसते नामदेवाने केलेली अभंगात्मक चरित्राची निर्मिती अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत होत राहिली. चरित्राविषयीच्या निवडीबाबत सिद्ध व साधक हा भेदभाव त्यांनी केला नाही. एकूण पौराण परंपरेशी संत नामदेवाने आपल्या चरित्रात्मक लेखनाचे नाते शोधले आहे. म्हणूनच प्राचीन मराठी वाङ्मूयातील संत नामदेवाचे अभंग म्हणून चरित्र – आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचे भूषण होय.

**५) उत्तर भारतातील दुसरी तीर्थयात्रा :–** " नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।"

या काव्य पक्तीत म्हटल्याप्रमाणे ईश्वरभक्तीच्या ज्ञानज्योतीवर असंख्य दीप उजळून मानवी जीवन उज्ज्वल करण्याचे त्यांचे जीवनध्येय होते. ज्या शब्दांनी जनता जनार्दन डोलू लागले, सर्वत्र प्रेमभाव वाढेल आणि आत्मज्ञानाचा दीप प्रज्वलित होईल असे साहित्य निर्माण करू अशी प्रेरणा, 'बोलू ऐसे बोल' या अभंग चरणात त्यांनी व्यक्त केली आहे. जनतेचा आध्यात्मिकदृष्ट्या विकास व्हावा हेच त्यांचे ध्येय होते, त्यामुळे ते स्वतः व त्यांची भाषा प्रांतिक मर्यादित अलिप्तपणे गुरफटलेली नाही. भक्तिप्रचारासाठी त्यांनी त्या काळातील लोक सरस्वतीत, म्हणजे हिंदी भाषेत रचना केली आणि आयुष्यभर भारत यात्रा चालू ठेवली. ते इतर प्रांतीय भाषा शिकले. महाराष्ट्रातून निघाल्यावर ते थेट दक्षिणेस म्हैसूर (कर्नाटकासह) तामीळनाडू, रामेश्वरपर्यंत गेले व उत्तरेकडे, गुजरात, सौराष्ट्र, सिंधूप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाना, हिमाचलप्रदेश व पुनः पंजाबात भक्तिप्रचार करीत गेले. पंजाबी भाषेत त्यांनी पद्ये लिहिली. प्रांताप्रातातील भाषा आत्मसात केल्या आणि त्याचा उपयोग लोकजागृतीसाठी केला. त्या प्रचारकार्यात त्यांनी तथाकथित कनिष्ठ जातींना चांगल्या संस्कारांनी वर उचलून धरले व तथाकथित श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या जातींना इतरांच्या चालीने चालविण्यास शिकविले . देवभक्तीची एकच धुमाळी देशभर उडवून दिली आणि भक्तिभावाने वातावरण उभ्या देशात त्यांनी संचारत ठेवले.

संत नामदेवांना संत ज्ञानेश्वरांनंतर चौपन्न वर्षे आयुष्य लाभले. या चौपन्न वर्षांच्या दीर्घ काळात त्यांनी कन्याकुमारीपासून हिमाचलपर्यंत अनेक पादयात्रा केल्या. त्या काळाच्या असाहाय, भयाण अंधकारमय परिस्थितीत चाचपडणाऱ्या जनतेला अभय देणारा हा महापुरुष भीवरेच्या तटावरून उत्तरेस गेला. त्याने समाज संघटित व जागृत केला आणि भक्तिमार्गाचा झेंडा व समाज भावनेची स्फूर्ती पुढे नेली.

संत नामदेवांनी पहिली तीर्थयात्रा संत ज्ञानेश्वरादि संतांबरोबर शके १२१३ ते १२१८ च्या दरम्यान केली. दुसरी पदयात्रा त्यांनी दक्षिण भारतात केल्याची माहिती नवीन मिळालेल्या व तीर्थवळीतील तीर्थयात्रेतील गावांच्या नावावरून मिळते. श्रीशैलशिखर, मल्लिकार्जुन अरुणाचल, चिदंबर, विष्णुकांची, रामेश्वर, ताम्रपर्णिका,

आळुवा, कन्याकुमारी, हरिहरेश्वर, जनार्दन या तीर्थांच्या ठिकाणी शके १२१८ च्या सुमारास जाऊन नामदेवांनी भागवतधर्माचा, मानवधर्माचा प्रचार केला. त्यामुळे दक्षिण भारतातील राज्यांतून विखुरलेल्या दर्जी, छिप्पिगा या अल्पसंख्य लोकावर त्याचा प्रभाव पडला. तेव्हापासून ती अल्पसंख्य ज्ञाती आपणास नामदेव म्हणवू लागली व मद्रास (तामिळनाडू) राज्यातील भूसागर व मल्लि या ज्ञाती नामदेव हे ही आपल्या ज्ञातीचे समानार्थक नाव मानू लागले.

यानंतर संपूर्ण भारतवर्षाची प्रदीर्घ यात्रा नामदेवांनी पायी केल्याची माहिती नवीन उपलब्ध झालेली आहे. ही यात्रा शके १२२० ते १२२६ या सहा वर्षातील दिसते. वै. प्र. सी. सुबंध यांना पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्‌या संशोधन मंदिरात, शके १५०३ मध्ये लिहिलेले एक जुने हस्तलिखित मिळाले. हे तीर्थयात्रांचे टाचण चौदा अभंगात आहे. त्यात नादेवांनी सर्व भारताची जी पदयात्रा केली त्यांचे वर्णन, संक्षेपने केलेले आहे. ही तीर्थयात्रा संत नामदेवांनी एकाच वेळी व एकट्यानेच केली असल्याचे दिसून येते. कारण इतर संत त्यांच्याबरोबर असल्याचा कोठेही उल्लेख नाही. या प्रदीर्घ यात्रेत नामदेव काही तीर्थक्षेत्रात अनेक महिने राहत असत. ''षण्मास राहिल्या द्वारकेचे पुण्य। एक दिवशी संकोव्दारी तेथे जाऊनि पाहिला देव॥'' या अभंगचरणावरून व्दारकेला नामदेवाचा मुक्काम सहा महिने होता व या मुक्कामात ते संकोव्दाराला गेले होते हे कळते. या पादयात्रेची सुरुवात पश्चिमेकडून झाली. नंतर पश्चिमेकडून उत्तरेकडे व उत्तरेकडून पूर्वेकडील तीर्थक्षेत्र पहात पहात पुन्हा ते पंढरपुरास आले. ती पदयात्रा पुढील क्रमाने पूर्ण झाली. या तीर्थाची नावे – नीरा – भोवरासंगम, गोदावरी, नाशिक – पंचवटी, घृष्णेश्वर, ओंकारमांधाता, व्दारका, रैवतंक, ढवळापूर, मुचकुंदगुंफा, प्रभास, सोरटी सोमनाथ, सिद्‌धपूर, पुष्कर, कुरुक्षेत्र, ठाणेश्वर, यमुनातीर, इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, अंतर्वेदी, मायापूर, हरिव्दार, हृषीकेश, देवप्रयाग, केदारी, कैलास, बद्रिनारायण, मानससरोवर, गंडकी, अयोध्या, नैमिष्याख्य, मधुपुरी, गोकुळवृंदावंन, कालियाडोह, गौतमेश्वर, मिथिला(जनकनगरी) उज्जयिनी, प्रयाग, काशी, विश्वेश्वर, गया, गंगासागर संगम, महाबळेश्वर व पुन्हा परत पंढरपूर अशी ही सहावर्षांची पद्‌यात्रा होय. संत नामदेवांनी या तीर्थयाचिंतील पुढील अनुभव सांगितले

आहेत.

" गंगेचा ओघ पहावया जातां । कष्टलों बहुत शरीरे ॥
अवघड मार्ग न दिसे पुढे । मग तारिले विठ्ठले ॥
तेथून जाता उत्तरपंथे । खुंटली शरीराची आंस ॥
हिमाचल पर्वत उल्लंघिता । बहु झालो कासावीस ॥
वज्रकीटाचे लागले पाणी । जीवे झालो कासावीस ॥
हिवाच्या लहरी आंगी च ढोनि । चढले श्वास उच्छावास ॥
श्रीहरीच्या कृपे तरलो ॥"

पुलिंदं, पुल्कस, यवन, खस हे मदयमांस भक्षक राक्षस त्रास देतात म्हणून मानस सरोवरापलिकडच्या भागात नामदेव गेले नाहीत. त्यानंतर नामदेवांचया या पदयात्रेची कल्पना देणारा पुरावा म्हणजे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी शके १८४६ मध्ये प्रसिद्ध केलेली 'महिकावतीची ऊर्फ माहिमची बरवर' होय. मलिक बहादूर ऊर्फ मलिक गाझी बेग ऊर्फ गिआसुद्दीन तुघलक हा त्यावेळी दौलताबादेचा अधिकारी म्हणजे सुलतान होता. त्याची आणि नामदेवाची भेट इ. स. १३२१ ते १३२६ (शके १२४३ ते १२४८) च्या काळात केव्हातरी झाली असावी. याच काळात भक्तिमार्गाच्या कार्यासाठी नामदेवांनी भ्रमण करून प्राणपणाने सर्वत्र चैतन्यदायी टवटवी निर्माण केली आणि अनेकांना भक्तिमय जीवनाच्या प्रवाहात आणून सोडले.

या चवथ्या पदयात्रेत नामदेवांनी कीर्तनभजनाच्याव्दारे श्री विठ्ठलनामाचा आणि ईश्वरभक्तीचा एवढा प्रचार केला की, त्याचा प्रभाव मध्यभारत व उत्तर भारत येथील साहित्यावर झाल्याशिवाय राहिला नाही. नदी कोरडी पडली तरी तिच्या पात्रात थोडेसे उकरताच जसा पाण्याचा प्रवाह झुळझुळताना दिसतो त्याप्रमाणे नामदेवांच्या भक्तिप्रवाहाचे परिणाम त्यांच्यानंतर होऊन गेलेल्या मध्यभारत व उत्तरभारतातील साहित्यात आढळून येतात. हे नामदेवानंतर पन्नास वर्षानी होऊन गेलेल्या भक्तकवी नरसी मेहतांच्या

(शके १३३४ ते १४००) नामदेवासंबंधी काव्यसंग्रहातील गौरवपूर्ण उद्‌गारावरून दिसून येते. उदा :– १) जेर्णे नामानुं छापरू छाई आल्यू (ज्याने नामदेवांची झोपडी दुरुस्त केली.) २) रामानुं नामदेवे लिधूं (नाामदेवांनी रामनाम घेतले) ३) सोई नामदवनुं देवळ फेरव्युं (ज्याने नामदेवासाठी देऊळही फिरविले) ४) पंढरपूर नगर छे एक, ते मां नामा सोई विशेक, नामदेनुं हरिसी प्रीत (पंढरपूरनामक एका गावत विशेष हरिप्रीती असलेले नामदेव राहत.)

पुढे नामदेवांनी राजस्थानकडे संचार केला. ठिकठिकाणच्या मुक्कामात त्यांनी भजनकीर्तनाचा पाऊस पाडला. त्यामुळे राजस्थानच्या जीवनावर अनंतकाळ संस्कार करणारे परिणाम झाले. राजस्थानमधील जयपूर येथील तीन नामदेवमंदिर, जोधपूर, अलवर येथील मंदिरे, बिकानेरजवळ कोलयतजी येथील नामदेवरायांची विहीर, पुष्काराज येथील दोन मंदिरे, बगरू, संगनिर, कामशेर इत्यादी ठिकाणी जुन्या नव्या स्वरूपातील उभी असलेली १५० चे वर नामदेवांची लहान मोठी सार्वजनिक मंदिर ही त्यांच्या राजस्थानमधील प्रचारकार्याची आजही साक्ष देतात. सामाजिक दृष्या संत नामदेवांच्या पदयात्रेचा दुसरा असा एक परिणाम झाला की, या भागातील शिंपी तेव्हापासून स्वतःस नामवंशी छिपा दर्जी असे म्हणू लागले. या जातीची संख्या राजस्थानात हल्ली मोठ्या प्रमाणात आहे. तसेच राजस्थानातील प्रसिद्ध संतकवयित्री मीराबाई (इ. स. १४९७ ते १५४६) यांनी पूर्ववर्ती कवींचा उल्लेख करताना नामदेवांचाही भावपूर्ण शब्दात निर्देश केला आहे.

'दास कबीर घर चालद जो लाया, नामदेव की छान छबन्द ||' संत मीराबाई श्री कृष्णाचा उद्‌देशून म्हणतात की, कबीराचे घरी बैल आणले, नामदेवाचे छप्पर शाकारून दिले. असा उल्लेख आपल्या काव्यात त्यांनी केला आहे.

राजस्थानानंतर, नामदेव वैष्णवाच्या मंदियाळीसह भक्तिमार्गाचा प्रचार करीत प्रयाग, वाराणसी, गया इ. स्थळी गेले त्यावेळी उत्तरेत मुसलमानी संतांचे एकछत्र राज्य होते. परिणामी, भारतीय समाज हतबल झाला होता. दुभंगून गेला होता हिंदी भाषिकांच्या या प्रदेशात नामदेवांनी कीर्तन संस्थेच्या प्राचीन

व्यासपीठावरून एकेश्वरवादाचा, विशुद्ध भक्तीचा, जातिवर्ण निरपेक्ष मानवधर्माचा आणि सदाचारपूर्ण जीवनाचा आदेश, त्या काळातील लोकभाषेत म्हणजे हिंदीभाषेत दिला. त्यांनी हिंदी – मुस्लमानांच्या भावनात्मक एकतेसाठी आवाहन केले. मानवी समतेचा पुरस्कार केला. नामदेवांची कित्येक पदे निर्गुणवाद परिपूर्ण आहेत. हिंदू – मुसलमानांच्या अंध धर्मश्रद्धेचा त्यात उपहासच आहे. या दोन्ही धर्मातील रूढीचा व बोजड कर्मकांडाचा त्यांनी निषेधच केला आहे. यावरून नामदेवांनी कित्येक हिंदी पदात निर्गुण निराकार परमेश्वराची महत्ता गायलेली आहे हे सिद्ध होते. सगुणोपासना व एकेश्वरवाद या दोहोंनाही समान स्थान देणे त्यांना आवश्यक वाटत होते. वाराणसीच्या परिसरात नामदेवांचे वास्तव्य अनेक वर्षे होते. त्यांच्या तेथील पायाभूत कामगिरीने पुढील भारतीय कवींना प्रभावित केले व त्यांच्या भागवत धर्माच्या शिकवणीमुळे त्यांचे आध्यामिक पोषण झाले. संत नामदेवांची ही पदयात्रा शके १२४९ च्या सुमारास संपली. शके १२६० वद्य पंचमीस नामदेवांचे शिष्य चोखामेळा हे मंगळवेढे येथे कुसाचे काम करीत असताना त्यांनी लोक सोडला. नामदेवांनी पंढरपुरास त्यांच्या अस्थी आणून देवाचे महाव्दारासमोर आपल्या यातिहीन शिष्योत्रेमाचे कायमचे स्मारक केले. मानवाच्या विकासात अडथळा निर्माण करणारी अस्पृश्यता ही आजच्या प्रमाणेच त्याकाळी बिकट समस्या होती. नामदेवांनी यातिहीनांचीही सेवा करून अस्पृश्योद्धारावरील श्रद्धा व महत्व जगास पटवून दिले. माणसांमाणसातील विषमता दूर कारण्याचे त्यांनी सर्व प्रथम जे प्रयत्न केले त्यांपैकी हा एक प्रमुख प्रयत्न होय.

शके १२६१ च्या सुमारास पुन्हा संत नामदेवांच्या पायाची चक्रे गतिमान झाली व ते उत्तरेकडे गेले असे बाबा पुराणदासकृत्त जनमसाखी व इतर पंजाबी साहित्यावरून स्पष्ट होते. त्यांत दिलेल्या हकीकतीवरून, नामदेव हे त्यावेळी एकटेच तीर्थयात्रा करीत द्वारकेहून तेथून माखाड येथे व तथून मथूरेकडे गेले. पुढे हरिव्दारास जाऊन तेथून ते पंजाबकडे गेले पंजाबातील गुरुदासपूर जिल्हा ही त्यांची कित्येक वर्षे कर्मभूमीच बनली. हरव्दारजवळ बसलेल्या शहरानपूर जिल्ह्यातील ज्वालापूर येथे ते गेले होते. या ठिकाणी नामदेवांच्या स्मरणार्थ एक मठवजा स्मृतिमंदिर उभारण्यात आले आहे. यानंतर पंजाबातील अमृतसर तहसिलीत भूतविंड

म्हणून एक गाव आहे. तेथे नामदेवराय आले. तेथे राहून ते खेडोपाडी जाऊन वैष्णवधर्माचा प्रचार करू लागले. भूतविंडाचा बहोरदास, भट्टिवालचे जलो व लद्धा, घोमानचा केशो कलंदर, असे विविध शिष्य – प्रशिष्य नामदेवांच्या ज्ञानदीपाची ज्योत आणखी उजळण्यासाठी पुढे सरसावले. नामदेवांच्या कार्याचा सर्वदूर विस्तार होऊ लागला. नामदेवांया कर्तृत्वाचे महात्म्य तलाव भट्टिवाल व घोमान येथे निर्माण झाले. भाविकांची ती श्रद्धास्थाने बनली. बसी पठाना, भावलपूर, लाहोर, मुलातान जिल्ह्यातील, दुनियापूर, मरडी, अमृतसर, पक्काक रोड, मुलतान, जालंदर, लुधियाना, भिवानी, हिसार, अंबाळा, रोहोतक, या गावी नामदेवांची लहान मोठी मंदिरे आजही आहेत. ज्ञानदीपाच्या त्या प्रकाशखुणा आहेत, भूतविंडा गावचा बाहरदास यास नामदेवांनी मरतामरता वाचविले. तेव्हापासून तो नामदेवांच्या संवेत राहून लागला. हाच पुढे नामदेवांचा पट्टाशिष्य झाला व प्रसिद्धीस आला. 'घूमान' येथील देवालयाची व्यवस्था अद्यापही बोहोरदासांच्याच वंशजाकडे आहे. भूतविंडयाहून पुढे भट्टिवाल या गावी तेथील लोकांचे विनंतीवरून तलाव बांधला व विहीर खणली त्या ठिकाणी पाणी उफाळून आले. त्यातलावास नामदेवांच्या स्मरणार्थ 'नामियाना' असे नाव देण्यात आले. त्याच गावचे जल्लो व लद्धा हे ख्यातनाम दोन शिष्य नामदेवांचे झाले. पुढे जल्लो हा पंढरीची वारी करू लागला तर लद्धा हा नामदेवाचे शिकवणुकीचा प्रसार करू लागला त्यानंतर नामदेव अमृतसरनजीक ३५ मैलावर गुरूदासपूर जिल्ह्यातील एका जंगलातील रमणीय तलावाजवळ येऊन स्थायिक झाले. नामदेवाच्या वास्तव्याने या जंगलाचा संपूर्ण कायापलट झाला व तेथे एक गावच वसले. फिरत फिरत नामदेव या ठिकाणी गेले म्हणून त्या वस्तीत 'घुमान' असे म्हणतात. घुमने म्हणजे फिरणे या घुमान गावी नामदेवाच्या अलौकिक दैवीशक्तीने तेथील तळयास चांगले पाणी लागले अशी अख्यायिका आहे. त्या तळ्याचाही नामदेवांच्या येथील वास्तव्यात एक सुंदर इतिहासच बनला तेथे नामदेवांचा प्रसिद्ध शिष्य केसो हा ब्रम्हचारी व कुष्टरोगी होता. तो आत्महत्या करण्याच्या विचारात होता. इतक्यात त्याला नामदेवाकडे जाण्याचे कोणीतरी सुचविले तेव्हा नामदेवानी त्यास त्या तळयात स्नान करून येण्यास सांगितले त्याप्रमाणे तो स्नान करून आल्यावर त्याचा महारोग संपूर्ण नाहीसा झाला. यापुढे तो नामदेवाच्या साधना शिबिरात

त्यांची सेवा करू लागला. त्याच्याकरिता नामदेवाने आणखी एक तलाव खणल व पाण्याची आपल्या शिष्यवर्गाची कायमची सोय केली, हा केसो कलंधर हा भावलपूर संस्थानात लोकांना भागवत धर्माची शिकवण देत असे, भावलपूर येथे त्याचा आजही आश्रम आहे. त्याची तेथे समाधीही आहे. त्यांचा आश्रम 'कलधारीकी गद्‌दी' यानावाने प्रसिद्ध आहे. भावलपूर हे भारताच्या विभाजनाच्या वेळी पाकिस्तानात गेले. वरीलप्रमाणे इतरही पुष्कळ लोकाचे रोग ह्या घुमान येथील तळ्यात स्नान करून संत नामदेवामुळे बरे झाले. एका आंधळयाला दृष्टी देखिल लाभली अशास अनेक चमत्कारांनी त्यांची कीर्ती सर्वत्र पुष्कळच पसरली व दिल्लीचा बादशहा आलम ऊर्फ अल्लाउद्‌दीन यांच्याही कानी गेली. बादशहासही संत नामदेवांची दर्शन घेण्याची उत्कंट इच्छा होऊन तो घुमान येथे आला. बादशहाने नामदेवांना मोठा नजराणा देऊ केला. पण तो त्यांनी नाकाराला. शेवटी, त्याने नामदेवांकरिता एक मंदिर उभारण्याचे योजिले व तेच घुमान येथील मंदिराचे मूळ कारण होय. ह्याच बादशहाने तलावाच्या बाजू पक्क्या बांधण्यास हुकूम दिला. व त्याच्या दैनंदिन खर्चास्तव काही जमीनही इनाम दिली अशी आख्यायिका आहे.

संत नामदेवांनी हिंदू – मुस्लीम अशा उभय समाजाची जेथे वस्ती होती त्या भागात घुमान येथे कायम राहून पद्‌यात्रा केल्या. ही आव्हानच देत होती. या गावांची नावे अशी :– बन्सी, मरडी (जि. अमृतसर) दुनियापूर, (जि. मुलतानी), भावलपूर, पक्कावरोड (जि. मुलतान), लाहोर, अमृतसर, मुलतान, लायलपूर जालंदर, लुधियाना, अंबाला, राहोटक, भिवानी, हिसार या सर्व गावी नामदेवांची लहानमोठी मंदिरे आजही आहेत. भाकरा धरणाकडे जाणाऱ्या रेल्वे मार्गावर पठानन रेल्वे स्टेशनलगत, बसी पठाना हे खेडे आहे. ते पूर्वी पतियाळा संस्थानातील पेप्स जिल्ह्यात होते. ते सध्या पूर्व पंजाबमध्ये आहे. येथेही नामदेवांनी वैष्णवभक्तीचा प्रचार केला.

'घुमान' येथे नामदेवांचे वास्तव शके १२७१ पर्यंत होते. पंढरपूरास जाण्याकरिता घुमानहून मकरसंक्रांतीच्या दिवशी संत नामदेवांनी प्रयाण केले म्हणून तेथे मकरसंक्रांतीच्या दिवशी म्हणजे प्रतिवर्षी माघशुद्‌ध व्दितीयेस महायात्रा भरत असते.

संत नामदेवांनी उत्तरभारतातील या मूलभूत कामगिरीने पुढील काळातील भारतीय कवींनी प्रेरणा मिळाली व या मूळ वैष्णवधर्माच्या शिकवणीमुळे त्यांचे आध्यामिक उत्थान झाले. संत नामदेव व रामानंद या संताच्या वरील विचार बीजपेरणीतून संत कबीरदास व गुरुनानकदेव यास प्रेरणा मिळून त्यांनी भारतातील हिंदू – मुस्लमानांच्या ऐक्याचे प्रयल केले. या प्रयलातूनच शीख धर्माचा प्रचंड वृक्ष निर्माण झाला. संत नामदेवांनी प्रज्वलित केलेल्या ज्ञानदीपाच्या प्रकाशात अनेकांना मानव धर्माचे खरेखुरे दर्शन घडले.

संत नामदेवांनी आपल्या आयुष्यात संपूर्ण भारतवर्षाची प्रदीर्घ तीर्थ यात्रा केली व त्यातून सर्वत्र 'ज्ञानदीप' प्रकाशीत करण्याची जी कल्पना त्यांनी साकारल केली हे त्यांच्या आत्मचरित्रायातील अभंगाचे खास वैशिष्ट्य मानता येईल हे स्पष्ट होते.

## ६) श्री क्षेत्र पंढरपूरची महासमाधी :–

श्री संत नामदेव यांची श्री क्षेत्रे पंढरपूरची महासमाधी किंवा कोणत्याही सत्पुरुषांचा दृश्य जीविताचा अंत हा अनंताशी अक्षय नाते जोडणारा असतो. अंतसमयी त्यांची जन्मजन्मांतर्यची साधना परमसिद्धीच्या फुलोऱ्याने डवरून जाते आणि मग त्यांचे करचणवंत रूप कायमचे दृष्टिआड झाल्यावरही त्या फुलोऱ्याचा परिमळ जगतात निरंतर दरवळत राहतो. सत्पुरूषाच्या जीवनामध्ये शेवटचा दिस' हा असा महामहिमामय असल्यामुळेच, आपण त्यांच्या जयंती ऐवजी त्यांची पुण्यतिथी संस्मरणीय मानतो. संत नामदेव महाराज संत श्री ज्ञानदेवांच्या नंतर चौपन्न वर्षे जगले. त्यांनी या काळात लोकांना भक्तिसामृत पाजून व त्यांच्या अतंःकरणात भक्तीचे बीजारोपण करून त्यास स्वधर्म प्रवृत्त केले. श्री नामदेवांनी भागवत धर्माचा प्रसाद करण्याच्या कामी आपले सर्व जीवन वेचले. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी अभंग संकीर्तने केली. आपल्या सभोवताली जमलेल्या असंख्य लोकांमध्ये ईश्वर भक्ति, परस्पर प्रेमभाव, जनसेवा यांचा प्रादुर्भाव केला. जात – गोत – प्रांत – भांषा – आदीचे लौकिक बांध फोडले. परमार्थदृष्ट्या परमेश्वराच्या व लौकिकदृष्ट्या जनता जनार्दनाच्या भजनी अनेकांना लावले. 'जनीजनार्दन ऐसा भाव' हाच त्यांच्या

जीवनातील एकमेव स्थायीभाव होता. शूद्रातिशूद्रांची सेवा करणाऱ्या नामदेवांच्या दृष्टीला मानवातील देवच दिसला.

"आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा ।
माझिया सकळां हरिच्या दासां ।।"

या त्यांच्या पसायादानात हीच मानवतेची विशाल, उदात्त आणि मौलिक कल्पना सामावलेली आहे. उत्तर भारतातील लोकजागृतीचे व लोक संघटनेचे कार्य आटोपून अखेरीस ते आपल्या भूतपूर्व स्थळी श्री क्षेत्र पंढरपूर येथे परत आले. पंढरी, पांडुरंग, चंद्रभागा, पुंडलिक इत्यादी नावे त्यांच्या जीवनात आवडती व अविस्मरणीय होती. ऐंशी वर्षांच्या प्रदीर्घ जीवनानंत , आषाढ शुद्ध ११ शके १२७२ या तिथीस, नामदेवराय श्री पांडुरंगापाशी जाऊन लडिवाळपणे म्हणाले, " देवा । आता मला समाधी घेण्यास अनुज्ञा द्या. अंतकाळ अगदी समीप आला आहे. माझ्या जीवनात मला ज्ञानेशाचा सहवास लाभला. त्यांच्या सहवासात मी तीर्थयात्रा केली. शतकोटी अभंगाचा संकल्प सिद्धीस नेला. सारे लोक भक्तिमार्गास लावून भगवद्भक्तीने त्यांच्या जन्माचे सार्थक झाले. माझी आता कोणतीही वासना उरलेली नाही. तुझ्या कृपेने माझे सारे मनोरथ पूर्ण झाले आहे. तुझ्या चरणापाशी जागा मिळावी एवढीच माझी तुला अखेरची विनंती आहे" नामदेवांचे संतशिष्य परिसा भागवत यांनी हेच पुढील अभंगात सांगितले आहे.

"आषाढ शुद्ध एकादशी । नामा विनवी विठ्ठलासी । आज्ञा द्यावी हो मजसी । समाधि विश्रांती लागी ।।
आयुष्य कळसासी आलें । अभंग त्वां सिद्धी नेले । ज्ञानेश्वर संगती घडले । तीर्थ मीषे जगदुद्धार ।।
जन्मा आलियाचें कृत्य । जन लावावे सुपंथे ।। विठ्ठल मंत्र त्रिभुवनांत । जग जाणत महिमा हे ।।
सर्व सिद्ध मनोरथ । तुझे कृपेंने समस्त । म्हणे परिसा भागवत । नाम नामा जपतेसे ।। " १२)

नामदेवराय आषाढ वद्य १३ शके १२७२ रोजी विकृत नाम संवत्सरे या मंगल दिवशी शनिवार तारीख ३ जुलै, सन १३५० राजी वयाच्या ८०व्या वर्षी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या महाद्वारात समाधिस्थ झाले. यांचे वर्णन संत परसा भागवताने अभंगांत केले आहे.

''नामा महाव्दारी श्रेष्ठ हे पंढरी । प्रत्यक्ष भूवरी वैकुंठ हें ॥''

येथून पुढे पंढरीस पांडुरंगाच्या दर्शनाला येणारा संताच्या चरणरजांच्या स्पर्श आपणाला व्हावा अशी नामदेवांची इच्छा असल्यामुळे विठ्ठल मंदिराच्या महाव्दारातील पहिल्या पायरीखाली खास तयारी केलेल्या समाधिस्थानी ते आसनस्थ झाले. त्यावेळी आकाश पाताळ दुमदुमत सोडणाऱ्या हरिनामांच्या प्रचंड गजरात नामदेव महाराजांनी आपले समाधिव्दार बंद करण्यास संतांना विनविले.

संत नामदेवरायांची एक गर्भवती सून लाडाई ही यावेळी कल्याणी येथे प्रसुतीसाठी गेली होती. त्यामुळे तिला समाधि महोत्सवाचे सुख मिळविता आले नाही. नामदेवरायांचा समाधिप्रसंग नमूद करून, लाडाईने स्वतःचा विषाद पुढील अभंगात व्यक्त केले आहे.

''पूर्व संबंधें मज दिधले बापाने । शेखी काम जार्णे कैसें झालें ॥१॥
प्रसुतीलागी मज आणिले कल्याणा । अंतरला राण पंढरीचा ॥२॥
मुकुंदे मजशी थोर केला गोवा । लोटियलें भवनदीमाजी ॥३॥
ऐकिला वृत्तांत सर्व जाले गुप्त । माझेचि संचित खोटे कैसें ॥४॥
व्दादश बहात्तरी कृष्ण त्रयोदशी । आषाढ हे मासी देवव्दारी ॥५॥
सर्वांनी हा देह अर्पिला विठ्ठल । मज कां ठेविलें पापिणीसी ॥६॥
लाडाई म्हणे देह अर्पीन विठ्ठला । म्हणोनी आदरिला प्राणायाम ॥७॥ [१३]

नामदेवांच्या या सुनेला मुकुंद नामक पुत्र होऊन पुढे वंशविस्तार झाला. अशा रितीने शके १२७२ आषाढ वद्य त्रयोदशीस मध्ययुगातील या थोरसंताने आपली जीवनज्योत परमात्म्याच्या चरणी विलीन केली. संत नामदेवांच्या समाधीच्या दिवशी त्यांच्या कुंटुंबातील सर्वांनी सांध्वी जनाबाई सह एकावेळी देह ठेवला अशी एक वदंता वरील अभंगातील ''ऐकिला वृत्तांत सर्व जाले गुप्त'' या पदय पक्तीच्या आधारे प्रचारात आहे.

निसर्ग क्रमानुसार नामदेवांचे आयुष्य जेव्हा संपले, तेव्हा सर्वसामान्य माणसा प्रमाणे ते यथाकाळ दिवगंत झाले असे कोणीही म्हटलेले नाही. तर आपले अवतारकार्य संपल्यावर संत ज्ञानेश्वरांनी जशी

समाधि घेतली तसे नामदेवहि समाधिस्थ झाले हीच समजूत सर्व मान्य आहे. मतभेद आहे तो नामदेवांच्या स्थानाबाबत. पंजाबातले घुमान, मराठवाड्यातील नरसी आणि श्री क्षेत्र पंढरपूर यांपैकी प्रत्येक ठिकाणी नामदेवाची समाधी आहे. असे अनेकांनी आपापली मतमंतातरे मांडली आहेत.

श्री क्षेत्र पंढरपुरातील श्री विठ्ठलाच्या देवळाच्या पूर्वेकडच्या दरवाज्याने लोक फार जातात व येतात या दरवाजात महाव्दार अथवा नामदेव दरवाजा म्हणतात. येथपर्यंत जाण्यास बारा पायऱ्या चढाव्या लागतात. पहिल्या पायरीस नामदेवांची पायरी म्हणतात. हे नाव पाडण्याचे कारण असे सांगतात की, पांडुरंगाच्या दर्शनास अनेक भक्त येतात, त्यांचे पाय आपल्या मस्तकास लागले तर आपण उद्धरू, म्हणून नामदेवांची आपण होऊन देवाजवळ या जागेची मागणी केली व ही जागा त्यांस मिळाली. नामदेव पायरीवर व तिच्या वरच्या पायरीच्या समोरच्या बाजूस पितळेचा पत्रा बसविलेला आहे. या पायरीवर चढणाऱ्या मनुष्याच्या उजव्या हातास नामदेवांचा एक पितळेचा, मुखवटा लागतो. वरच्या पायरीच्या दर्शनी बाजूस पत्रा आहे. त्यावर चौदा मनुष्याकृती उठविल्या आहेत. नामदेवांनी ज्यावेळस येथे समाधी घेतली, त्याचवेळेस त्यांच्या चौदा नातलगांनी चंद्रभागेत उड्या घेतल्या, असे त्या आकृती दाखवितात. संत नामदेवांच्या मुखवट्यास मराठेशाही पोषाख घालून माळा घालतात व गंध लावतात. हा मुखवटा शिंपी गुमास्त्यांच्या देखरेखीत असून त्यापुढे येणारे उत्पन्न बडव्यांकडे जाते. नामदेव पायरीपुढे संगमरवरी फरशी केली असून तेथे कीर्तन वगैरे होते. नामदेव मोठे साधू व भगवदभक्त होऊन गेले, म्हणून त्यांच्या पायरीवर पाय देऊन कोणी जात नाही. १४)

"उन्होने ८० वर्षे की आयुमें सन १३५० में पंढरपुर के
विठ्ठल मंदिर के महाव्दार पर समाधी लेली ।" (१५)

'संत नामदेवाची समाधि विठोबारायाच्या पायरीशी पंढरपूरासच आहे. ती समाधि त्यांनी आषाढ वद्य त्रयोदशीला घेतली.

"नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे ।
संत पाय हिरे देती वरी ।।"

या अभंगात म्हटल्याप्रमाणे नामदेवांनी आपले सर्वस्व देवाच्या पायाखाली घातले. नामदेवांनी समाधि घेतली तीहि सहकुटुंब सहपरिवार त्यांची लाडाई नावाची सून गरोदर असल्याने माहेरी होती तीच काय ती मागे राहिली' १६)

इहलोकांतील आपले जीवित कार्य संपले आहे, हे ध्यानात घेऊन संत योगीजन स्वतःहून समाधिस्थ होऊन देह त्याग करतात. संत ज्ञानेश्वरांनी अशा प्रकारे जी समाधि घेतली, तिचे वर्णन नामदेवांनी 'ज्ञानेश्वर – समाधि' या प्रकरणात केले आहे. आळंदीस इंद्रायणीच्या काठी भक्तजनांनी जागा खणली, नामदेवांच्या पुत्रांनी ती झाडून स्वच्छ केली. ज्ञानेश्वर आंत समाधिस्थळी उतरले आणि आणि त्यांनी समाधि घेतल्यावर 'समाधि परिपूर्ण बैसले ज्ञानेश्वर । निवृत्तीने बाहेर आणिले गोपाळा । घातियेली शिळा समाधीशी ।। (अ.क्र ११०१)

असे त्या प्रसंगाचे संत नामदेवांनी वर्णन केले आहे.

अशारीतीने महात्मे जेथे स्वतःचा देह ठेवतात, त्याच जागी त्याचे जे स्मारक उभविले जाईल, तीच त्यांची मूळची खरी समाधि होय. संताने जेथे समाधि घेतली तेथेच त्यांच्या भक्तांनी बांधलेली त्यांची समाधी असे या स्थानाचे वर्णन करता येईल. पण या शिवाय देखील जेथे जेथे त्यांच्या हयातीत त्यांनी संचार केला असेल, तेथे तेथे त्यांच्या पादुका वा त्यांच्या आस्थि पुरून त्यावर त्यांचे स्मारक व वृंदावन उभे केले असेल. तर त्यालाहि त्यांची समाधि म्हणून त्यांचे भक्तजन संबोधतात. अशी स्मारक म्हणजे गौणस्वरूपाच्या समाधि होत. वरील खुलाशाच्या आधारे नामदेवांचे घुमान येथील समाधि, तसेच नरसी येथील समाधि व श्री क्षेत्र पंढरपूर येथील समाधि संबंधी कोडे उलगडून स्पष्ट होईल यात काही शंका वाटत नाही. काही अभ्यासकांच्यामते नामदेवांच्या समाधिच्या वेळी एकट्या नामदेवांनीच समाधि घेतली असे मत मांडले आहे. त्याच्या पुष्ट्यर्थ नामदेवांचे पुत्राचे काही अभंगावरून दिसून येते.

'अंतकाळी नामा धरिला हृदयी । ठेवियला पायी गोदा म्हणे.' (गोदा)

'आमुचा नामा तुज गेला खुनी । मी तुजवांपोनी नेणे करणा ।। (विठा)

आमुचे ठेवणे जुगादीचे नागर्णे । जातां नामयाने सांगितले ।। (विठा)

नामदेवे सांगितले जातां । ते सर्वथा देईजे ।। (विठा)

आम्हांसी घातले तुझिये आभारी । विठा म्हणे अंगीकारी नारायणा ।। (विठा)

जितुके देर्णे तितुकें घेईन मी आतां । नामयाने जातां सांगितलें ।। (विठा)

गोदा आणि विठा या दोन नामदेव पुत्रांच्या उद्गारांचा विचार करता नामदेव परिवारातील चौदा माणसांनी नामदेवाबरोबर समाधि घेतली, या समजुतीत तथ्य उरत नाही. या समजुतीत इतकाच अर्थ असल्याचा संभव आहे की, नामदेवाच्या पायारीशीच आपलेही स्मारक असावे अशी नामदेव परिवारातील सर्वांची इच्छा होती. आणि पुढिलांनी त्या इच्छेला साद दिली. नामदवाचा पितृभक्त पुत्र गोंदयाने आपल्या एका अभंगात आपल्या पुण्यश्लोक पित्याच्या समाधिस्थानाचा अगदी निःसदिग्ध शब्दांत निर्देश केला आहे.

"आवडला नामा देवा विठ्ठलाशी । ठेवी चरणांपाशी अखंडित ।।

नामयाची कुडी घातली पायरी । येता जाता हरी पाय देती ।।

आणिकही पाय देती साधुसंत । ऐसा पूर्ण भक्त उद्धरिला ।।

या प्रमाणे श्री विठ्ठलाने आपल्या आवडत्या नामयाला स्वतःच्या चरणांपाशी अखंडित ठेवून घेतले आहे हे सिद्ध होते. व आषाढ वद्य १३ शके १२७२ इ.स. १३५० हा नामदेवांच्या समाधीचा दिवस होय. त्याचप्रमाणे श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिराच्या महाव्दारी 'नामदेवांची पायरी' या नावाने सर्व परिचित असलेले स्थान हेच त्यांचे समाधिस्थान होय.

## चौथे प्रकरण

## संदर्भसूची


१) सकल संत गाथा (निवडक) संपादक – दा. का. थावरे

(श्री गोरोबाकुंभार महाराज) अभंग क्र. १ पृष्ठ क्र. १३

२) तत्रैव.................... अ. क्र ९ पृष्ठ क्र. १४

३) श्री नामदेव गाथा शासकीय प्रकाशन पुर्नमुद्रण १९८२

अभंग क्र. १३४८ पृष्ठ क्र. ५६०

४) तत्रैव .................. अ. क्र. १३५० पान नं. ५६१

५) तत्रैव .................. अ. क्र. १३५१ पान नं. ५६१

६) तत्रैव ................... अ. क्र. ९०५ पान नं. ३३९

७) तत्रैव .................. अ. क्र. ९०३ पान नं. ३३९

८) तत्रैव .................. अ. क्र. ९१८ पान नं. ३४७

९) सार्थ ज्ञानेश्वरी : संपा. शं. वा. दांडेकर सन १९६७

प्रस्तावना पान. नं. ८

१०) श्री नामदेव गाथा शासकीय प्रकाशन पुर्नमुद्रण १९८२

अभंग क्र. १०९१ पान. नं. ४५१

११) तत्रैव ...................... परिशिष्ट 'क' तीर्थवळी अ. क्र. १० पान. नं. १०३८

१२) तत्रैव ........... परिशिष्ट 'अ' परिसाभागवताचा अभंग अ. क्र. ५४८ पान नं. १०३२

१३) तत्रैव .............................. अभंग क्र. ४ पान नं. ८७६

१४) संत नामदेवउ – हे. वि. इनामदार आवृत्ती दुसरी १९९४ पान नं. ११८

१५) तत्रैव ....................... पान नं. ११८

१६) तत्रैव ......................... पान नं. ११८